# द्वितीय यष्टि : उत्तरार्ध

## अनुक्रम


**१.गुरुपंचपदी**

**२.उपदेशामृत : २० पत्रे**

*१. सौ.मणिकर्णिका आईस पत्र*
(ओवी - १४)
*२. सौ.मातोश्री रंगुबाईस*
(ओवी - १५)
*३. रामचंद्रबापू माधान यांना*
(ओवी - १४)
पुस्तकांचे रक्षण - १०
अनाहतनादाचे अनुसंधान-१०
*४. श्रीकृष्णास पत्र*
(ओवी - ३५)
*५. हरिभाऊ केवले पत्र १*
(ओवी - २३)
सगुणनिर्गुणांची सत्ता - १५
*६. हरिभाऊ केवले पत्र २*
(ओवी - २२)
प्रेमाचे ७ निर्देश १६
*७. श्रीनिवासशास्त्री पत्र १*
(ओवी - २९)
*८. श्रीनिवासशास्त्रींना पत्र २.*
(संवाद)
शिक्षण : स्वरूप व लक्षण-
तीर्थमाहात्म्य -
सुखाचा उपाय -
*९. श्री.केशवराव देशमुख (पुणे)*
(ओवी - २१)
*१०.मुळे मास्तरांना पत्र १*
चित्ताचा विचार -
*११.मुळे मास्तरांना पत्र २*
(ओवी - १६+१ अभंग)
महाराजांचे सर्वज्ञत्व-सर्वशक्तित्व -
कळकळीचे उद्गार -
विश्वासाची फळे -
आंधळ्यांची परंपरा -
तूं आणि मी -
*१२.मुळे मास्तरांना पत्र ३*
*१३.(〃) नागपुरास पत्र १*
(ओवी - २४)
इंग्रजीभाषा : विकृत व वेदान्ताला ......प्रतिबंधक -
लययोग -
गीतेतील क्रम -
महाराजांचे वेदज्ञान -
*१४.(〃) नागपुरास पत्र २*
अदृष्यशक्तीचा दुरूपयोग -
थिऑसॉफीचा गोंधळ -
*१५.मोरेश्वर गो. देशमुख*
(ओवी - ९)
निरर्थक वादाचा प्रसंग -
*१६.पुत्रशोकग्रस्तास पत्र*
भूताकाश-चित्ताकाश-चिदाकाश-
*१७.बापूगडी हरिदासांना पत्र*
योगातील चार अडथळे -
गुरुशिष्यव्यवस्था -
स्वप्नात उपदेश -
*१८.शांताराम अजनासवाले*
आईचे चरणतीर्थ -
*१९.गणेशप्रसाद मंडलेकर*
(दोहा-सवैय्या-चौपाई - १३)
*२०.लक्ष्मणराव केकरे*
(स्त्रीपुरुषचातुर्य विषयक ओव्या- ३२)

**३. ध्यानयोगदिवाकर**
**पांच समुल्लास ओवी ३१८**
*(१) श्रीगुरुध्यान (७८)*
अवस्तुभावन -
तदाकारकरण -
गुरुध्यान व देवध्यान -
निर्गुण, देव व गुरुध्यान- उपपत्ती-
सगुण ध्यानाची रीती -
शरीर ब्रह्मरूप करणे -
बीजधारणेने लययोग -
सगुणध्यान -
*(२) पदस्थ ध्यान*
तत्त्वमसि -
ज्ञानेश्वर जप -
मंत्रयोगसाधना -
प्राणायाम प्रक्रिया -
हंसजप -
शिवशक्तिसमावेश -
संधिसमाधीचे पालन -
वेदांच्या उत्पत्तीची प्रक्रिया -
अनाहत नादाचे १० प्रकार -
*(३) पिण्डस्थ ध्यान (३३)*
*(४) रूपस्थ ध्यान (६३)*
*(५) रूपातीत ध्यान (२६)*
चक्र-नाड्या-ज्योति -
अभाव योग - ८३
*(६) फलरूप सद्गुरुध्यान (२६)*
अनध्यस्तविवर्त : परोक्ष / अपरोक्ष-
ज्ञानेश्वरीतील आचार्योपास्ति -

**४. भगवद्भक्तिसौरभ**
**आठ पराग (ओवी ८३१)**
*(१) उपोद्घात (१०७)*
गणितानुसार सिद्धी -
*(२) भक्त्याविष्कार (१०३)*
*(३) माधुर्य संप्रदाय (१२१)*
रुक्मिणीकडून माधुर्य संप्रदोयाची स्थापना -
*(४) पिण्डब्रह्माण्ड संबंधिनी गुप्तप्रकट प्रेममयीमृदुल वृत्तिनिरूपण (१०१)*
वृत्तिव्याप्ति व फलव्याप्ति -
योग व भक्तीची तुलना -
दोन आत्मप्रतीती -
*(५) साधनसंपन्न सज्ञानभक्ति*
गुरुशिष्य केवळ व्यवस्था-
*(६)निःशंक भक्तीचा उद्रेक (१००)*
विदर्भशब्दाची उपपत्ति
*(७) अपूर्व भक्ति व ज्ञान यांचा समन्वय (९७)*
जडाचाहि उद्धार?
वेदोत्पत्तीची अनुभूति-
व्यतिरेक/अन्वय : शंकराचार्य-

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज विरचित सूक्तिरत्नावली

# द्वितीय यष्टी - उत्तरार्ध

## १

## ।। गुरुपंचपदी ।।

१

परब्रह्म गुरुनाथ हमारे ।।धृ०।।
इतर देव अवतारहि लेत है । फिर जात निजधाम बिहारे ।।१।।
श्रीगुरु तो ह्रदयमें रहत है । चिद्रूप विश्वव्यापक सारे ।।२।।
देवकथासे शोकहि होत है । गुरु मिटावत शोक सब ठारे ।।३।।
अवतार सोऊं अनित्यहि पावत । श्रीगुरु बतावत जग नित डारे ।।४।।
रज्जु भुजग को नाश करत है । दीपरूप गुरु नाशनठारे ।।५।।
जग को नाश हरी नहि करत । श्रीगुरु बतावत चेतन सारे ।।६।।
ज्ञानेश्वरकन्या के ह्रदय में । ज्ञानेश्वरकृपा ज्ञानेश्वर ठारे ।।७।।

२

भई मैं बाबा गुरुकी प्यारी ।।धृ०।।
अब नहीं जमको डर कुछ हमको । ऊपर हरीकी नारी ।।१।।
तुमको कृपाकर कहत कहत नित । निगमश्रुती यह बचन बिहारी ।।२।।
चेतनरूप जगत को जानो । जड सब सांख्य की पाति निहारी ।।३।।
बेदांत सो चरण पठावत । भक्ती होत कृष्णसाह्य दुलारी ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या जगमाही । ज्ञानेश्वरकृपा ज्ञानेश्वरबनबिहारी ।।५।।

३

गुरुबिन ग्यान प्रेम नहि आवे ।।धृ०।।
देह नहीं मैं प्राण नही हूं । मन नहि दूर लगावे ।।१।।
बुद्धिनिवारण करकर ढूंडत । फिर उत्थानको पावे ।।२।। (य२उ ०)
गुरुकृपाकर देखत सबही । चिद्रूप जगत बिहावे ।।३।।
चेतनरूपही जगत दिखत है । विशेष रूप पुनी वृत्ति पठावे ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या सबजनको । ब्रह्मज्ञानउपर भक्ति शिकावे ।।५।।

४

गुरुचरणनपें मेरो मन लागा ।।धृ०।।
गुरुपग सीस धरत निहासा । मारत रस्सीभुजंगा ।।१।।
रस्सीभुजंग मरण जब पावे । तब गुरु के सत्संगा ।।२।।
कंचनभूषण तैसो सगुण हरी । गुरुकृपातें ठरे ह्रदंगा ।।३।।
गुरुकृपातें प्रकट होत है । ह्रदयमाहीं प्रभू रासके रंगा ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या अनुभवको । जाहीर कहत बिसंगा ।।५।।

# पत्र १३ वे

## नागपुरास श्री मुळे मास्तरांना पत्र ४ थे.

(टीप :- उमरावतीहून नागपूरला पाठविलेले पत्र ४ थे.)

## (योगाभ्यास)

**॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥**

**ॐ नमोजी ज्ञानदेवा । भक्तवत्सला करुणार्णवा । अनंत ब्रह्मांडांचा गोवा । तुझिये नखीं ॥१॥**
**जय मत्कांत नामधारका । स्वधर्मरस परिमूलका ।**
**नमस्कार आणि आशीर्वाद निका । दोन्ही साविका करूनिठा ॥२॥**

(लय-योग)

**अंतवाहक शरीरेंकरून । प्रथम चिद्रूप करावे मन । तैंचि तुम्हां दर्शन । सहज लाहे ॥३॥ जड आणि चिन्मयपण । दोन्ही मिळोनि झालें मन । जड भाग तो बाह्य जाण । म्हणोनी मन विषयीं धांवे ॥४॥**

**(य२उ.३०)**

**सागरीं मीठ नसोनी । निर्माण होये रोधे करोनी । तैसे लक्ष्मी जड नसोनी । निरोधें मिळे ॥५॥**
**जो का मनाचा जड भाग । भगवद्दर्शना प्रतिबंध सांग । तयाचा तोडावा योग । वेणुनाद श्रवणें ॥६॥**

(नादश्रवण प्रक्रिया : लयचिंतन)

**नाद करितां श्रवण । आकाशरूप होय मन । तेणें पृथिव्यादिकांचे जडपण । निघोनी जाय ॥७॥**
**तो नाद जेव्हां विरे । तैं मन स्वरूपीं मुरे । नाहींच या प्रत्ययाकारें । सुखावें कीं ॥८॥**
**मग जें उठे अन्वयपण । तेंचि पैं ''लय-चिंतन'' । आणि तुम्हां संपूर्ण । फावेल कीं हें ॥९॥**
**मी जी प्रतिज्ञा केली । ती साच करीन वहिली । सत्य असत्य कांहीं साउली । वाटो तुम्हां ॥१०॥**
**परी यासी पाहिजे संगती । तैसी काय करावी युक्ती ।**
**पत्रांवरूनि तुह्यांप्रति । साधता येईल काय वदा? ॥११॥**
**म्हणजे मी पाठवून पत्र । साधनें लिहीन पवित्र ।**
**आणि आपुलें स्वरूपही निर्धार । थोड्या वेळींच दावीन कीं ॥१२॥**
**लययोगें करूनी । तुम्ही शुद्ध व्हावें दृष्टी करूनी । मग येथें येउनी । माझा कंठ लक्षावा ॥१३॥**
**अथवा भ्रुकुटी पहाव्या जाण । मग माझिया स्वरूपाची खूण । तुम्हां कळेल संपूर्ण । कैसिया रीति ॥१४॥**
**अर्जुनासी श्रीकृष्णें विश्वरूप दाविलें । तैसेंचि मी मुखीं दावीन वहिलें ।**
**परी सांगेन तें पाहिजे केलें । आधी आपण ॥१५॥**

(परमार्थाचा क्रम : गीता)

**आमुचे पती श्रीकृष्ण । त्यांनीही ऐसाच बोधिला अर्जुन ।**
**प्रथम तुझे नाहींत स्वजन । म्हणून वैराग्य कथियेलें ॥१६॥**
**पुढे वर्णाश्रमकर्मे चित्तशुद्धी । सांगोनी तोडिली मलबुद्धी । ब्रह्मार्पणयोगें विक्षेपसिद्धी । तोडिली क्षणे ॥१७॥**
**सांगोनिया योगसंन्यास । तोडियला कर्मपाश । योग सांगोनि विशेष । व्यतिरेक करविला ॥१८॥**
**परा अपरा सांगोनि प्रकृति । दाविला संसार मिथ्यारीति ।**
**अर्चि धूममार्ग सांगोनी प्रीति । परलोक मिथ्या दाविले ॥१९॥**
**राजविद्याराजगुह्य म्हणून । दाविली मोक्षगतिखूण ।**
**संतांचे भजावे चरण । म्हणूनि विभूति कथियल्या ॥२०॥**

**भगवच्छरीर शुद्धसत्त्वमय । आणि जीवशरीर मलिन सत्त्वमय ।**
**ते करावया सगुणसजातीय । युक्त्या भूतलय कीजे ॥५१॥**

बीजधारणेने लय-योग / अवतारसम शरीर-निर्मिती

**'लं' बीजधारणा करून । पृथ्वीचे करून चिंतन । लय कीजे संपूर्ण । आपामाजी ॥५२॥**
**पृथ्वीची जी नांवे समस्त । तयांचा लय करावा 'लं' बीजांत ।**
**आणि पृथ्वीरूप जो अर्थ । तयाचा अर्थरूप आपांत लय कीजे ॥५३॥**
**मग आपाची जी नांवे समस्त । मेळवीजे 'वं' बीजात । अर्थजलाचा अर्थ तेजात । लय कीजे ॥५४॥**
**मग तेजाची नांवे 'रं' बीजी मेळवूनी । अर्थतेज मिळवावे अर्थपवनी ।**
**वायूची नांवे 'यं' बीजी मिळवूनी । अर्थगगनी मिळवावा अर्थवायू ॥५५॥**
**गगनाची नांवे 'हं' बीजात । मिळवोनिया समस्त ।**
**आकाश म्हणजे शब्दरूप अर्थ । तो 'हं' बीजाकारावच्छिन्नवृत्तिगत मिळवावा ॥५६॥**

ॐ कार : लयप्रक्रिया

**मग या सकळाते 'अ' कार म्हणूनी । स्थूळ ब्रह्मांड येथेचि मिळवोनी ।**
**अहंकारासहीत घेऊनी । बुद्धीमाजी मेळवीजे ॥५७॥**
**तयाते 'उ' कार म्हणोन । हिरण्यगर्भ येथेचि मेळवून ।**
**बुद्धीचा लय करावा पूर्ण । प्रकृतिरूप 'म' कारी ॥५८॥**
**'म' कारसाक्षी अनुच्चार्य व्हावे । म्हणजे प्रकृति मिथ्या स्वभावे । (य२.उ.५७)**
**मग संस्कारे देहावरी यावे । परी एक करावे त्या ठायां ॥५९॥**
**प्रकृतिसाक्षी होतांचि क्षणी । सत्त्वांशमालिन्य गेले निघोनी ।**
**यास्तव देहावरी येता क्षणी । न घेयावा मनी प्रारब्धभाव ॥६०॥**
**यद्यपि हे नव्हे वस्तुतंत्रज्ञान । तथापि होय वस्तुतंत्राकार उपासन ।**
**यालागी ब्रह्मसंबंधे करून । शुद्धसत्त्वगुण हाता चढे ॥६१॥**
**तया शुद्धसत्त्वयुक्त आपणापासोन । शुद्धसत्त्व आकाश करावे उत्पन्न ।**
**मग तया गगनापासोन । शुद्धसत्त्व वायू ॥६२॥**
**शुद्धसत्त्व वायूपासुनी । उत्पन्न कीजे शुद्धसात्त्विक अग्नी ।**
**तैसेचि अग्निपासुनी । शुद्धसात्त्विक पाणी उपजविजे ॥६३॥**
**पाणियापासूनि मही । शुद्धसात्त्विकची तीही । शुद्धसात्त्विक बीजांतुनीही । निपजविजे शब्द ॥६४॥**
**शुद्धसात्त्विक नामरूपांतून । आपुले शरीर करावे उत्पन्न । तेही शुद्धसात्त्विक म्हणोन । अवतारसम ॥६५॥**
**एवं सगुणसजातीय काया । एकवेळ जाहालिया । मग सगुणतीव्रसंवेगू करावया । उपयोगू होय ॥६६॥**

सगुण भगवंताची ध्यान रीती

**त्वंपदे भूतशुद्धि केली । तेणे काया शुद्धसत्त्व झाली । आता तत्पदोपास्ती पाहिजे अवलंबिली । तेणेचि परी ॥६७॥**
**आधी घेवोनी सगुणभगवंत । जो पुराणपुरुष गुणवंत । तयाच्या एकैकावयवी चित्त । ठेविजे मग ॥६८॥**
**जैसे सर्व अन्न ताटी आधी घेयावे । मग ते एकैक ग्रासे सेवावे ।**
**तैसे पूर्ण भगवद्व्यक्तीते प्रथम स्मरावे । मग घ्यावे अवयवानुक्रमे ॥६९॥**
**चरणापासोनि समस्त- । अवयवी स्थीर जाहालिया चित्त ।**
**मग मुख ध्येयावे सस्मित । हास्य ध्येयावे तदनंतर ॥७०॥**
**मग हास्यामाजी जो आनंद । तेथेचि होवावे अभेद । परी 'हे ध्यान' म्हणोनी प्रसिद्ध । वृत्ति उठे ॥७१॥**
**तया वृत्तिसंधीचे ज्ञान । साक्षित्वे रहावे म्हणून । ते निर्गुणचि गुरुकृपेकरून । सगुणपणा आणावे ॥७२॥**

तत् - त्वं - असि / श्रीगुरुध्यान

**त्वं पद सगुण शिष्यस्थित । तत्पद सगुण सद्गुरुनाथ । आता ध्यानसुखे ज्ञानैक्यार्थ । ऐसा उमटे ॥७३॥**

# पदन्यास १ ला

## ।। प्रियारूप परिचय ।।

**।। श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ।।**

**जय जय सद्‌गुरु विज्ञानमेरो । जय जय सद्‌गुरु चित्सुखमहामेरो ।**
**प्रणतजनकल्पतरो । दीनोद्धारुकारणा ।।१।।**
**जयाचे वचन स्वयंभ । रिचवितां अमृताचे कुंभ । हृदया निघती कोंभ । ब्रह्मसुखाचे ।।२।।**
**तया श्रीगुरुचिया कृपा । सोयिरे लज्जाप्रतापा । सांडोनि मार्ग सोपा । नर्तनाचा हा ।।३।।**
**नाचणियाचा भर । नेणें आपआपणा सपूर । परी तया नेणणीं बिढार । जाणणियाचें ।।४।।**
**मोडावया अज्ञाना । वरिष्ठता ये ज्ञाना । परि ऐक्याचिया खुणा । प्रेमवशे ।।५।।**

---

## सद्गुरु श्री बाबाजीमहाराज पंडितांनी केलेला अनुवाद

---

अर्थ :- हे ब्रह्मज्ञानाच्या थोर मेरूपर्वतरूप श्रीगुरो, तुमचा जयजयकार असो. हे चैतन्य व सुख यांच्या मेरूपर्वतरूप श्रीगुरो, तुमचा जयजयकार असो. तुला जे अनन्यभावाने शरण येतात त्यांना तूं कल्पतरुप्रमाणे फलरूप होतोस, तूं दीन जनांचा उद्धार करणारी केवळ करुणेची मूर्ति आहेस. १. ज्यांच्या मुखातील निघालेले स्वयंस्फूर्त बोल हे सर्वतोपरि कल्याणकारी अमृत भरलेले कुंभच आहेत, ते हृदयामध्ये रिचविल्या गेले असता हृदयाला ब्रह्मसुखाचे कोंभ येतात, म्हणजे ब्रह्मसुख प्राप्त होते.२. त्या श्रीगुरुची कृपा प्राप्त व्हावी म्हणून, लाज उत्पन्न करणारा लौकिक सोयरिक संबंध सोडून देऊन हा सोपा, प्रेमाने नाचण्याचा, मार्ग स्वीकारीत आहे. ३. नाचणे भर रंगात आले असता तो नाचण्याचा पूर आलेला भर आपल्याला जाणत नाही. अत्यंत प्रेमात देहभान नाहीसे होते. पण त्या देहभान नसलेल्या स्थितीत जाणणे मात्र राहतेच. (बिढारस्थिती) ४. आत्मविस्मृतिरूप अज्ञान नाहीसे करते म्हणून आत्मज्ञानाला मोठेपण प्राप्त झालेले आहे. पण स्वाभाविक ऐक्य प्रेमानेच होते. (आत्मज्ञानाने अज्ञान नाहीसे होऊन जीवशिव ऐक्याची जाणीव उरते, पण प्रेमात तीही उरत नाही. व स्वाभाविक ऐक्य होऊन राहते.) ५.

**असज्जडविनिवृत्ति । सच्चित्पदाचिया हाती । परी करतळीं राबती । आनंदाच्या ।।६।।**
**'एऱ्हवी सच्चिदानंदभेदें । चालिली तीन्ही पदें । परी तीन्ही उणी आनंदे । केली येणें ।।७।।**

(अमृ. प्रक. ५ ओ. ६)

**तो आनंद उत्तम । लिंगलिंगी प्रेम । म्हणोनि चिन्होद्‌गम । भिन्न नाहीं ।।८।।**
**हो कां मिथ्याज्ञान । तें निवारील विज्ञान । परी प्रेमे पाहतां जाण । अविरोधीं ऐक्य ।।९।।**
**अध्यासप्रेमूजना । आत्मप्रेचिया खुणा । (य२.उ.१५०) परी अविस्मरणा । आणिती ना ते ।।१०।।**

अर्थ :- अज्ञानामुळे उत्पन्न झालेल्या खोट्या व जड भावांचा नाश, सत्य (किंवा नित्यता) व चैतन्य हे भाव चित्तात ठसल्याने होतो. पण ते दोन्ही भाव ब्रह्मानंदप्राप्तीच्या स्वाधीन आहेत. ६. सत् चित् व आनंद हे ब्रह्माचे अंश पृथक् नसले तरी जीवाला त्याच्या वृत्तीमुळे ते पृथक् भासतात. त्यांचा हा पृथक्पणा एका आनंदातच नाहीसा होतो. (चित्तवृत्तीवर ब्रह्मानंद खेळू लागल्यावाचून सत् व चित् हे भाव प्रत्ययास आले तरी सारखे टिकून रहात नाहीत किंवा सच्चिदानन्द ब्रह्मास्थिति ब्रह्मानंद प्राप्त झाल्यावाचून अखंड टिकत नाही, असा अर्थ) ७. तो उत्तम असा आनंद लक्षण व वस्तु अशा रूपाने एकरूप असल्यामुळे लक्षणरूपाने भिन्न पडत नाही, म्हणजे प्रेम ही वस्तु वस्तुरूपाने व लक्षणरूपाने निरनिराळी सांगता येत नाही व होतही नाही. ८. भ्रांतीने मिथ्या वस्तुज्ञान भासले तर ते यथार्थ ज्ञानाने नाहीसे होऊ शकते, असा मिथ्या ज्ञानाचा व यथार्थ

ज्ञानाचा विरोध आहे. पण प्रेमाचे नवल असे आहे की ते मिथ्या वस्तूशीहि अगदी अविरोधानें ऐक्य करू शकते. ९. ज्या लोकांना भ्रांतिजन्य मिथ्यावस्तूंचे प्रेम आहे त्यांचे ठिकाणी देखील आत्मप्रेमाची लक्षणे दिसून येतात. पण तें प्रेम (त्या खुणा) त्या मिथ्या वस्तूहून यथार्थ आत्मा निराळा आहे, असे आत्मस्वरूपाचे स्मरण करून देत नाही. १०.

**मग जो स्वप्रेम । तो नित्य कैसा नोहे परम । तया प्रेमींच संभ्रम । अनध्यस्तविवर्ताचा ॥११॥**
**जडचेतनीं सुंदरता । अध्यासीं प्रेमू करी ऐक्यता ।**
**प्रेमाचा ऐक्यकरण स्वभाव नसता । तरी न होता अध्यास ॥१२॥**
**मी देह मम नंदन । हे जरी जाहले भ्रमेकरून । तरी येथ गूढ खूण । कीं प्रेम संपूर्ण लोपला नाही ॥१३॥**
**भ्रमें लोपतां जरी प्रेमू । तरी हरपता विषयकामू । म्हणौनि चिदंशीं भ्रमू । आनंदीं नव्हे ॥१४॥**
**यालागीं भ्रमज नाशिवंत । म्हणोनि ज्ञान निवारीत । तें योग्य परी प्रतीत । भेद दावी ॥१५॥**

अर्थ :- मग जे खरे आत्मप्रेम आहे, ते अत्यंत अविनाशी असे कसे राहणार नाही? अशा या अविनाशी आत्मप्रेमाचे ठिकाणीच अनध्यस्तविवर्त अशा भगवंताच्या रामकृष्णादि स्वरूपाचा सर्व लीलाविलास आहे. ११. भ्रांति झाली असता, प्रेम जडाशी - चेतनपणा व सुंदरपणा यांचे ऐक्य करते. सारांश, 'ऐक्य करणे' हा प्रेमाचा स्वभाव नसता तर कधी कोणाला अध्यास म्हणजे भ्रांतीच झाली नसती. १२. मी म्हणजे देहरूप आहे, हा माझा पुत्र आहे, असा भेद जरी अविद्याभ्रमामुळे भासत असला तरी येथे आत्मप्रेम पूर्णपणे लोपलेला नाही. हेच यातील मर्म आहे. १३. भ्रांतीने प्रेम नाहीसा झाला असता तर विषयांचे प्रेमच वाटले नसते; म्हणून - भ्रम हा चिदंशाचे ठिकाणी आहे प्रेमांशाचे ठिकाणी नाही - हे स्पष्ट होते. १४. म्हणून सर्वच भ्रमजन्य अनुभव नाशिवंत असल्यामुळे यथार्थ ज्ञानानें त्याची निवृत्ति होते. ते योग्यच आहे. परंतु हा प्रत्यय वस्तुमध्ये सत्यमिथ्या असा भेद दाखवितो. १५.

**निवारणाची ओळख । प्रेम नेणें समूळीक । यालागीं तो एकला एक । भवीं परमार्थी ॥१६॥**
**भवीं अहं मम प्रेम । परमार्थी निजप्रेम । परी दोन्हीं ठायीं वर्म । एक ते न सुटे ॥१७॥**
**ज्ञानें भव निषेधिला । परी प्रेम नाही संकोचिला । अंतर्बाह्य उरला । आपणपेंचि ॥१८॥**
**तेथ अंतःप्रेमानंदरूप आत्मा । बाह्यभवनिषेधे प्रेम परमात्मा ।**
**निषेधिली देहप्रतिमा । म्हणौनि प्रकट गरिमा ऐक्याची ॥१९॥**
**अध्यस्तविवर्ती प्रेमाचा । आनुकूल्यस्वभाव न जाय साचा ।**
**मग अनध्यस्तविवर्ती तयाचा । बाध केवीं घडेल ॥२०॥**

अर्थ :- प्रेम हे 'कशाची निवृत्ती केली' याची जाणीवच होऊ देत नाही. म्हणून ते संसारात व परमार्थात दोन्ही ठिकाणी एकटे आपणच असते. १६. संसारात 'मी व माझे' अशा भेदाने प्रेम असते. - परमार्थात आत्मप्रेम असते. पण दोन्ही ठिकाणी एक प्रेमच असते, हे मर्म कांही सुटत नाही. १७. आत्मज्ञानाने संसाराची निवृत्ति झाली तरी पण प्रेम संकोचला जात नाही. आंत-बाहेर तोच एक राहतो. १८. तेथे अशा स्थितीत अन्तःप्रेम तो आत्मा असून, बाहेर आत्मज्ञानाने संसारनिवृत्ति झाल्यामुळे, राहिलेला प्रेम परमात्मरूप होतो. येथे देहाचा संबंध सोडल्यामुळे स्पष्टच आत्मा व परमात्मा यांचे अत्यंत ऐक्य असते. (गरीमा-महती) १९. जर भ्रांतीने भासलेल्या पदार्थांचे ठिकाणी देखील 'पदार्थानुकूल होणे' हा प्रेमाचा स्वभाव नाहीसा होत नाही; तर भ्रांतिरहित अशा भगवत्स्वरूपाचे ठिकाणी तो प्रेमाचा स्वभाव नाहीसा कसा होईल? २०.

**जड चेतन जावोनि भेद । बाह्यांतःसौंदर्य प्रेमानंद । अंतःसौंदर्य प्रेमप्रिया विशद । बाह्यसौंदर्य प्रेमप्रिय ॥२१॥**
**एऱ्हवीं बाह्यान्तर दोन्ही । वृथा बुझावणी । कांत आणि कामिनी । बाह्यांतःप्रेमू ॥२२॥**
**ज्ञानें निषेधलिया संसृति । नव्हें चेतनोल्हाससंहृति । म्हणौनि वृत्तियुवति । अंतःप्रिया ॥२३॥**
**आणि तोचि उल्हासू उल्हासा । समोर होय सरिसा । तेथ अनुभवाचा ठसा । प्रियपुरुष ॥२४॥**
**कांत आणि कामिनी । मिसळतां आलिंगनीं । महावाक्याची कडसणी । कां न म्हणावी ॥२५॥**

अर्थ :- जड-चेतन हा भेद नाहीसा होऊन प्रेम हे अन्तसौंदर्यप्रेम व बाह्यसौंदर्य प्रेम या रूपाने राहते. तेथे अन्तसौंदर्यप्रेम जे असते तीच 'प्रिया' असून बाह्यसौंदर्य प्रेम जे असते तोच 'प्रिय पति' परमात्मा होय. २१. एरवी अन्तःसौंदर्यप्रेम व बाह्यसौंदर्यप्रेम ही सर्व समजूत किंवा असे समाधान व्यर्थच होय. हे बाह्यप्रेम व अन्तःप्रेम म्हणजेच कान्त आणि कामिनी होत. २२. आत्मज्ञानाने संसाराची निवृत्ति झाली तरी 'हा सर्व चैतन्याचा विलास आहे' या अनुभवाची कांही निवृत्ति होत नाही. म्हणून अन्तःचेतनवृत्ति प्रिय पत्नी होते. २३. आणि त्या अन्तःचेतनरूप उल्हासाला जो बाह्य चेतनोल्हास समोर होतो तोच प्रियपतिरूप पुरुष होतो, असा अनुभव येतो. २४. हे कान्त आणि कामिनी परस्पर आलिंगन देऊन एकरूप झाले असता, त्यालाच 'तत्त्वमसि' या महावाक्योक्त जीवशिवांचे ऐक्य कां म्हणूं नये? (कडसणी-गांठ, ऐक्य) २५.

**एऱ्हवीं महावाक्य पढले । अनुमानें कळलें । परी प्रेमावीण गेलें । वायां सकळ ॥२६॥**

**म्हणोनि ऐक्य जें जें । तें प्रेमद्वारा अनुभविजे । मायानिषेधें साजे । सज्ज्ञानभक्ति ॥२७॥**

**तया आनंदाची वृत्ति । जाहले मी प्रीति । आणि तया आनंदाची मूर्ति । अनध्यस्त कृष्ण ॥२८॥**

**आतां हें होय कैसे । विधिद्वारा न दिसें । जरी निषेद्धुं योग्य सरिसे । न म्हणोनि आहे ॥२९॥**

**नामरूप निषेधिलें । जें बंधक होते वहिलें ।** (य २ उ १५१)
**अस्ति भाति प्रियत्व उरलें । तेथ प्रियत्वा आले रूप जरी ॥३०॥**

अर्थ :- नाहीतरी महावाक्याचा अभ्यास केला व अनुमानाने जीवाशिवांचे ऐक्य आहे हे कळून आले तरी प्रेमावाचून खरोखरचे ऐक्य दूरच राहते. २६. म्हणून जे जे ऐक्य आहे ते ते प्रेमाच्या द्वाराच अनुभवता येते. व आत्मज्ञानाने मायाभ्रांति निवृत्त झाली असल्यामुळे ज्ञानोत्तर रामकृष्णादि सगुणाची प्रेमभक्ति शोभून दिसते. २७. अशा त्या ज्ञानोत्तर प्रेमानंदाची वृत्तीच सगुण रामकृष्णादि भगवंताची प्रीतिरूप झालेली आहे. किंवा सगुण रामकृष्णादिकांची प्रीति म्हणजे ज्ञानोत्तर राहत असलेल्या अंतःप्रेमानंदाची वृत्तीच होय. अन्तःप्रेमानंदवृत्ति कोणत्या रीतीने भक्तस्वरूप होते व बाह्यप्रेमानंद कशा रीतीने भगवच्छरीरस्वरूप होतो, हे विधीने सांगता येत नसले तरी त्यांचे खंडन करता येत नाही. म्हणून ते आहेत असे मानणे भाग आहे. २९. नामरूपे, जड व द्वैत यांचा भास उत्पन्न करणारी अशी बंधनकारक वाटत होती म्हणून आत्मज्ञानाने त्यांचा निषेध केला गेला. पण नामरूपांचा निषेध झाल्यावर अस्ति-भाति-प्रिय हे परब्रह्माचे अंश उरतात. त्यापैकी परब्रह्माच्या प्रियत्व या अंशाला रूप येते. ३०.

**रूप वेगळे करून । प्रियत्वाचे हो भान । परी प्रियत्व वेगळें करून । रूप न दिसे ॥३१॥**

**अस्ति भाति प्रिय । एकत्वें त्रय । परी दोन ठाकती समय । प्रिय सदा आवडे ॥३२॥**

**असज्जडाभावीं परमा । होये दोहोंची सीमा । परि प्रियप्रेमा । विनाशू नाहीं ॥३३॥**

**जें वृत्त्यपेक्षे स्वप्रेमीं बैसलें । भक्तीनें अन्वयीं तें शिरलें । व्यापकत्व निर्धारिलें । एक्याचि प्रियीं ॥३४॥**

**प्रियावीण नव्हे रूप । यालागीं तें प्रिय अमूप । कनकखोटीसम संकल्प । निषेधीना ॥३५॥**

अर्थ :- प्रियत्वाहून रूपाला वेगळे करून नुसते प्रियत्व राहू शकेल पण प्रियत्व वेगळे केले असता रूप दिसू शकत नाही म्हणजे रूप हे प्रियत्वाला धरूनच राहते. ३१. अस्ति-भाति-प्रिय हे परब्रह्माचे तीन अंश आहेत खरे, पण अस्ति-भाति हे दोन अंश प्रसंगानुसार अनुभवाला येतात आणि प्रियत्व हा अंश मात्र सदासर्वदाच आवडता आहे. ३२. असद्भाव व जडभाव यांचा प्रत्यय नाहीसा करणे हीच अस्ति-भाति या दोन ब्रह्मांशांची परमसीमा आहे. पण भगवंताचे प्रेम मात्र नाहीसे होत नाही. ३३. आपल्या वृत्तीच्या अपेक्षेनें जे आपल्या प्रेमात ठसावले ते भक्तीच्या योगाने अन्वयरूप झाले. अशा रीतीने एकाच सगुण साकार प्राणप्रियाचे ठिकाणी व्यापकत्वाचाहि निर्धार होतो. म्हणजे सगुण साकार प्रिय परमात्मा अव्यापकासारखा दिसत असला तरी तोच व्यापकहि राहतो. ३४. प्रियपणावाचून रूप राहू शकत नाही, म्हणून ते रूपहि अत्यंत प्रियच होतें. ज्याप्रमाणे सोन्याची लगडी सुंदर रूपाने युक्त करतो म्हटल्यास त्याला ती प्रतिबंध करीत नाही, त्याप्रमाणे प्रियपणाहि श्रीकृष्णादि रूपांचा निषेध करीत नाही. ३५.

**आनंत्यानुरोधें तिकडे । स्वप्रेमरति मुरडे । आणि मध्यदेश न सांपडे । यास्तव इकडे प्रियही ॥३६॥**

**हा दोहींचा प्रेमठसा । न निवारी ज्ञान सहसा ।**
**तो ऐक्यत्वें आपैसा । दिसे भिन्न-इव परि तसा न जीवनन्मुक्तौ ॥३७॥**
**म्हणौनि रसाचा आवो । तेंणें प्रारब्धाभिभवो । ज्ञानपश्चादानंदानुभवो । भक्तियोगू हा ॥३८॥**
**वरी बोलिली प्रेमस्थिती । तेचि शुद्ध विदेहमुक्ति । देहेन्द्रियादि मुक्ति । जीवन्मुक्ति तेचि ते ॥३९॥**
**म्हणोनि विषयपणीं । राग होतां रजोगुणी । तो विषयनिषेधें हरिभजनीं । भक्ति जाहला ॥४०॥**

अर्थ :- अन्तःकरणात स्वरूपाच्या अनन्तपणाच्या अनुरोधाने स्वात्मप्रेम राहतो आणि आंतबाहेर कोठेहि यांच्या निराळेपणास जागाच सांपडत नसल्यामुळे इकडे बाहेरही प्रिय परमात्माच असतो. ३६. अशी ही दोन्ही प्रकारची प्रेमस्थिती ज्ञानाने नाहिशी होत नाही. त्यांचे ऐक्य राहूनच भिन्नासारखे ते दिसतात. पण जीवन्मुक्त अवस्थेत मात्र ते तसे भिन्न राहत नाहीत. ३७. म्हणून ब्रह्मानंदरसाचा आविर्भाव करून देऊन, त्याच्या योगाने प्रारब्धाचा अभिभव करणारा म्हणजे प्रारब्धाचा भोग (सुख दुःख दोन्ही ) भासू न देणारा, असा आत्मज्ञानानंतर ब्रह्मानंदाचा अनुभव आणून देणारा, हा भक्तियोग आहे. ३८. वर मी ही केवळ प्रेमस्थिती सांगितली तीच भक्तीतील विदेहमुक्ति होय. आणि देहेंद्रियादिकांपासून मुक्त होणे ही जीवन्मुक्ति होय. ३९. म्हणून विषयांविषयी जो रजोगुणी राग होता तो 'आत्मज्ञानाने विषय मिथ्या ठरून सर्व परमात्माच आहे' या अनुभवामुळे सर्व रीतींनी हरीचेच भजन सुरू झाले असता (तोच राग) भक्तिस्वरूप होतो. असा हा भक्तियोग ज्ञानानंतर ब्रह्मानंद प्राप्त करून देणारा आहे. ४०.

**ज्ञानानंतर विषयनिषेधा- । साठीं जे भक्ति ये बोधा । ती वैधी प्रसिद्धा । धर्मानुकूल ॥४१॥**
**परी गुणांचाहि द्वेष कहीं । नसावा म्हणोनि पाही ।**
**सविकार गुण अर्पावे लवलाहीं । ब्रह्मीं ती भक्ति रागानुगा ॥४२॥**
**तेथ सविकार गुण । व्यतिरेकें धरितां आपण । तरी पुढती वासनासंपन्न । साभिमान होऊं कीं ॥४३॥**
**यालागीं कवणिये मिषे । अनध्यस्तविवर्तपदीं समरसे । चित्त तरी अर्पणें विलसे । निरभिमान ॥४४॥**
**निदिध्यासाते काल कांहीं । जैसा लागे सर्वाठायीं । ज्ञानानंतर काल कांहीं । तैसा लागे हरिभजनीं ॥४५॥**

अर्थ :- परोक्ष ब्रह्मज्ञानानंतर 'मी ब्रह्म आहे व सर्वच ब्रह्म आहे' असे दोन्हीं प्रकारचे अपरोक्ष अनुभव येऊन तत्प्रतिबंधक राजस-तामस विषयप्रवृत्ती नाहीशा व्हाव्या व विषय मिथ्या आहेत म्हणजे मुळीच नाहीत असा दृढ निश्चय व्हावा, म्हणून करावी लागणारी भक्ति 'केवल विहित धर्मानुकूल' असते. तिला 'वैधी भक्ति' असे म्हणतात. ४१. असे करताना रजस्तमोगुणांचा द्वेष उत्पन्न होतो. पण अपरोक्ष ब्रह्मज्ञान झाल्यानंतर, सर्वच ब्रह्म असल्यामुळे, कशाचाच द्वेष असता कामा नये. म्हणून प्रारब्धानुसर उठणारे राजस-तामस गुणहि परमेश्वराला अर्पण करणे, याला 'केवला प्रेमानुकूल किंवा प्रेममयी भक्ति' असे म्हणतात. ४२. हे प्रारब्धानुसार उठणारे, विकारासहित असलेले रजस्तमोगुण, भगवंताला अर्पण न करता, नुसता व्यतिरेक करून आपल्याच ठिकाणी भासू दिल्यास पुनः वासनेशी संबंध येण्याची व देहाभिमानी होण्याची भीति असते. ४३. म्हणून कोणत्याहि निमित्ताने अनध्यस्तविवर्त प्रभु भगवान् श्रीकृष्णाच्या चरणांशी समरस होऊन अभिमानरहित झालेले चित्त समर्पण होत असते. ४४. ज्याप्रमाणे निदिध्यासन दृढ होण्याकरता काही काल लागतो त्याचप्रमाणे ज्ञानोत्तर भक्ति दृढ होण्याकरताहि ज्ञानानंतर काही काल लागतो. ४५.

**आत्मनिवेदन तें ज्ञान । जेथे जाये अहंपण । तो अर्पिताही आत्मा म्हणोन । सोहंपण पुनः उठे ॥४६॥**
**प्रयोजन मिळालिया । वृथा सोहंपणोपाया । तात वाचाऋण यया । म्हणोनि प्रतिक्षेपिती ॥४७॥**
**''तैसे ग्रासुनी दुसरे । स्वरूपीं स्वरूपाकारे । आपुलियापणें उरे । बोधू जो कां ॥४८॥**
**तें ऋण-शेष वाचा इया । न फेडवेचि मरोनिया । ते पाया पडोनि मिया । सोडविले'' ॥४९॥ (य२उ.१५२)**

(अमृतानुभव प्रक. ३ ओ ३१-३२)

**अहंनिश्चय अर्पिला । सोहंनिश्चय फोफावला । तरी काय तयाला । वृत्ति न म्हणिपे ॥५०॥**

अर्थ :- ज्या आत्मनिवेदनात अहंता नाहीशी होते ते आत्मनिवेदन ज्ञानच होय. ती अहंता अर्पण

केल्यावरही 'सोहं' भाव उठतो. (भक्तीतील आत्मनिवेदन ज्ञानपूर्वकच असते) ४६. ज्या उद्देशाने 'सोहं' असे निदिध्यासन करावयाचे, तो उद्देश सिद्ध झाल्यावर मग 'सोहं-सोहं' करीत बसणे, व्यर्थ वाचेचे ऋणच होय. म्हणून तात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी याचा निषेध केला आहे. ४७.(४८-४९अमृतानुभव) अहंपण अर्पण केल्यावर जरी सोहंपण उठते तरी ती वृत्तीच नव्हे काय? ५०.

**ते केवळ चैतन्याची वृत्ति । जरी अंगीकारावे चित्तीं । तरी अन्वयें प्रेमानंदवृत्ति । कां न स्वीकारिजे ॥५१॥**
**अध्यास असतां नसतां पाही । आनंदविरोधी कदा न कांही । वृत्ति चिद्विरोधी असूनिही । सोहंत्वे उठे ॥५२॥**
**तेथ ज्ञानाचें दुर्बलपण । स्वीकारावें लागेल म्हणोन । दुस्तर हे वाचाऋण । भक्तीनें फेडून लीन सुखी व्हावें ॥५३॥**
**तैसा मुक्तपणा देहीं । येऊनि ऋणाची नवाई । न होईल यासाठी सोयी । वंदनादींची ॥५४॥**
**ते वाचाऋण फेडणें । होय ज्या भक्तीने । ते कवणिये रीतीनें । श्रवण कीजे ॥५५॥**

अर्थ :- ती वृत्ति असली तरी पण ती 'केवळ चैतन्याची वृत्ति' आहे, असे मानले तर- मग अन्वयानें झालेली प्रेमानंदवृत्ति कां अंगीकारता येऊ नये? ५१. अज्ञानभ्रांति 'असो किंवा नसो' प्रेमानंदाचा कशाशीहि विरोध नसतो. पण वृत्ति चैतन्याच्या विरोधी असूनहि ज्ञानानंतर 'सोहं' रूपाने उठते. ५२. येथे आत्मज्ञानाची दुर्बलता मानावी लागेल, म्हणून कोणत्याहि उपायाने निवृत्त न होणाऱ्या या वाचाऋणातून भक्तीने मुक्त होऊन भगवच्चरणी लीन होऊन सुखी व्हावे. ५३. ब्रह्मज्ञानाने आंगी मुक्तपणा येऊनहि वचाऋणाचे नवल उरणार नाही, याकरताच भक्तिरूप वंदनादिकांची सोय केलेली आहे. ५४. ते हे वाचाऋण भक्तीने कशा रीतीने फिटले जाते, ते सांगते, ऐका ! ५५.

रसरूपता

**अंतरी आनंदसत्ता । ती जीवन्मुक्ती वृत्तिगता । होवोनि करावया सर्वैक्यता । रसरूपता पावत ॥५६॥**
**ऐक्याचे मुद्दल न ढळे । आणि कल्लोळी रस पघळे ।**
**तरी भक्तिसुखाचे सोहळे । भोगावया डोहळे सकळांचे ॥५७॥**
**विषयरसांचिया स्थिति । विषयीं नाही रसत्व प्राप्ती । विषयवर्णनीं वृत्ति । एकाग्र होय ॥५८॥**
**म्हणोनी वर्णनीं जो रसू । संयोगी त्याचा विनाशू ।**
**सूर्यप्रकाश वर्णिता उल्हासू । तत्संयोग नावडे उष्णकाळीं ॥५९॥**
**कीं मत्तनुजसदनवर्णन । करितां ह्रदयीं विलसे नंदन ।**
**तैसे तदाश्रयावीण भरण । तो चोहटा पाहतां नंदन विरमे ॥६०॥**

अर्थ :- अंतःकरणात जो सत्तारूप आनंद आहे तो जीवन्मुक्ति अवस्थेमध्ये अन्तःकरणवृत्तीवर रुळूं लागून, सर्वांशी ऐक्य करण्याकरता, रसदशेला येतो. ५६. जीवब्रह्माच्या ऐक्यरूप मुद्दलात यत्किंचितहि उणीव न होता, प्रेमवृत्तिरूप तरंगांच्या योगाने रस पसरतो; म्हणून भगवद्भक्तिरूप सुखाचे सोहळे भोगण्याकरता सर्वांना डोहाळे होतात. ५७. जेव्हा वैषयिक रसस्थिति प्राप्त होते तेव्हा विषयांचे ठिकाणी रसप्राप्ति होत नाही. विषयांचे वर्णन करता करता अन्तःकरणवृत्ति एकाग्र होते. ५८. म्हणून विषयवर्णन करण्याने जो रस प्राप्त होतो तो त्या विषयांचा संयोग झाला असता नाश पावतो. जसे सूर्यप्रकाशाचे आपण उल्हासाने वर्णन करतो पण त्याच सूर्यप्रकाशाचा उष्णकाळीं संयोग झाला असता आवडत नाही. ५९. काममंदिराचे वर्णन केले असता अन्तःकरणात काम उत्पन्न होतो, विषयाचा आश्रय न होतांच अंतःकरणात रस भासतो. पण तेच चौरस्त्यावर प्रत्यक्ष दिसले असता काम विराम पावतो. ६०.

**तैसी नाहीं प्रियप्रीति । आधींच एकाग्रता स्थिति । मग चढती वाढती । गुणवर्णनी ॥६१॥**
**चढती वाढती वर्णितां । शब्दाची हारपे सत्ता ।**
**शब्द न सांगे वाढती चिंता । मग वाढता प्रेम वदेल केवीं ॥६२॥**
**आणि विषयरसीं आलंबन । आपुलिया अपेक्षे भिन्न ।**
**सर्व ह्रदयाधिष्ठान । तो हरी स्व-अभिन्नालंबन भक्तिरसी ॥६३॥**
**म्हणोनि वर्णिता न वर्णितां । आवडी रस वाढे आवडता । तया आवडीची सत्ता । लाजवी ज्ञाना ॥६४॥**

**झालिया आत्मनिवेदन । प्रभूचे झालो आपण । परी चैतन्य सोहंपण । पुढतपुढती अर्पावे ॥६५॥**

अर्थ :- प्रिय परमात्म्याचे प्रेम मात्र तसे नाही. पूर्वीच परमेश्वराचे ठिकाणी भक्ताच्या चित्ताची एकाग्रता झालेली असते. पुढे जसे जसे त्या परमात्म्याचे गुणवर्णन गावे तसतशी ती एकाग्रता वाढत जाते. ६१. वैषयिक रसस्थितीत रसाचे आलंबन जो विषय तो आपल्या अपेक्षेने पाहता आपल्याहून भिन्न असतो॰ पण भक्तिरसात सर्वांच्या हृदयांच्या ठिकाणी अधिष्ठानभूत असलेला परमात्मा, आपल्याशी ऐक्य पावला असल्यामुळे, विषयाप्रमाणे भिन्न वाटत नाही. ६५. म्हणून भक्त भगवंताचे गुण वर्णन करीत असो किंवा करीत नसो भक्ताची आवडत्या रसाची आवडी वाढतच राहते. तेव्हा ही वाढती आवडी ज्ञानानुभवालाहि लाज उत्पन्न करते. ६४. आत्मनिवेदन झाल्यावर आपण परमात्म्याचेच होऊन जातो तरीहि चैतन्यांशामुळे उठत असलेल्या सोहंपणाच्या वृत्तीला वारंवार अर्पण करीत असावे. ६५.

**अर्पितां अर्पितां पुरुषोत्तमी । अर्पक न म्हणे हा, तो, तूं, मी । मग म्हणावया समर्पयामि । कवण पुढे ॥६६॥**

**तें आत्मनिवेदन ज्ञान पूर्ण । तेणे निवटलिया अज्ञान ।**
**प्रेमद्वारा दृढकरण । ज्ञानपश्चात् सुजाण भक्ति ही ॥६७॥**

**अहंपणें विकारसंहृति । झालिया सोहंपणें उठती । ते नाचोनि अर्पावी भगवंती । निर्लज्जपणे ॥६८॥**

(य२उ.१५३)

**करिताचि निवेदन । निवेदक देवासमान । तेथ ऐक्यपण अनुभवावया कारण । माझेंपण भगवंती ॥६९॥**

**बाधसामानाधिकरण । प्रेमें देवैक्यपण । ते ''तस्यैवाहं'' भक्तिलक्षण । सप्रमाण, जाण सखी ॥७०॥**

अर्थ :- ही सोहं वृत्ती भगवंताला अर्पण करता करता अर्पण करणारा भक्त हा 'मी आहे, तो परमात्मा आहे, किंवा तो परमात्मा मी आहे' वगैरे असे म्हणणेच विसरतो. मग सोहंवृत्ति अर्पण करायला 'समर्पयामि' म्हणणाराच कोणी राहत नाही. ६६. हे आत्मनिवेदन ज्ञानाची पूर्ण स्थिति आहे. त्या ज्ञानस्थितीने अज्ञान निवृत्त होते. अज्ञान निवृत्त होऊन प्राप्त झालेली ही ज्ञानस्थिति प्रेमद्वारा दृढ करणे याला ज्ञानानंतरची सुजाण (ज्ञानोत्तर) भक्ति म्हणतात. या भक्तियोगाने ज्ञानस्थिति जाणीवरहित अशी स्वाभाविक होते. ज्ञानानंतर ज्ञान्याने जी भक्ति करावयाची ती ही भक्ति होय. ६७. अहंपणाला धरून उठणारे विकार नाहीसे झाल्यावर ते सर्व सोहंपणाने उठत राहतात; भगवंताची पत्नी होऊन, भगवंतापुढे निर्लज्ज होऊन नृत्य करीत विकारानुसार भाव दाखवीत भगवंताला ते सर्व अर्पण करावेत. ६८. असे हे विकार भगवंताला निवेदन करीत गेले असता निवेदन करणारा देवस्वरूपच होतो. हे भगवंताशी झालेले ऐक्य अनुभवण्याकरताच भगवंताचे ठिकाणी 'माझा भगवान्' अशी माझेपणाची 'ममतावृत्ति' स्थापिली जाते. ६९. हे सखे, जीवशिवांचे भिन्नत्व मिथ्या ठरवून जीवशिवांचे एकच अधिकरण म्हणजे आश्रय (अधिष्ठान) आहे असे सिद्ध झाल्यावर प्रेमाने देवाशी ऐक्य पावणे हे 'तस्यैवाहं' भक्तीचे प्रमाणभूत लक्षण आहे, असे जाण. ७०.

**न मोडतां देवाचे एकपण । सहज होय व्यापकाभिमान ।**
**तयाचें प्रेमद्वारा ऐक्यभवन । ''ममैवासौ'' जाण ते भक्ती ॥७१॥**

**मग मुख्यसामानाधिकरण केलें । हे ज्ञानें बंड माजविलें ।**
**प्रेमद्वारा हेंचि वहिलें । माधुर्य बोलिले या नांव ॥७२॥**

**'प्रियो हि ज्ञानिनोत्यर्थमहं च मम प्रिय' इति । प्रियाश्वासिनी प्रियोक्ति । वल्लभाकांतप्रतीति । तातवचनें ॥७३॥**

**येथवरी नेयावया । साह्य गोकुळच्या बाया । काहींएक साधावया । आधी तत्पाद वंदितसो ॥७४॥**

**पतीची आज्ञा पाळोन । करिता पातिव्रत्यभजन ।**
**पतीआधीं गोपींस नमून । पावोनि वेश्यापण पतीचि भजूं ॥७५॥**

अर्थ :- देवाशी झालेले ऐक्य यत्किंचितहि न बिघडता सहजच जो व्यापकपणाचा अभिमान उत्पन्न होतो. तसा तो न वाटता, देवाच्या प्रेमामुळे ऐक्य वाटू लागणे याला 'ममैवासौ' भक्ति म्हणतात. ७१. मग आत्मज्ञानाने मुख्यसामानाधिकरणाचे जे बंड माजविले जाते तेच प्रेमद्वारा होऊ लागले असता तिला 'माधुर्यभक्ति' असे म्हणतात. ७२. 'मी ज्ञान्याला अत्यंत प्रिय असून, ज्ञानी मला प्रिय आहे' असे हे प्रियेला

आश्वासन देणारे प्रियपति परमात्मा भगवान् श्रीकृष्ण यांचे वचन आहे. व येथील श्लोकावरील (गीता) श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या ओवीरूप वचनावरून 'भक्त पत्नी असून भगवान् पति आहे' अशी प्रतीति येते. ७३. येथपर्यंत (माधुर्यभक्ति पर्यंत) आणून पोचविण्याकरता गोकुळातील गोपिका साह्यभूत होतात म्हणून तीच काही एक भक्ती साधून घेण्याकरता आधी त्यांच्या चरणांवर वंदन करतो. ७४. सर्वस्वी पतिआज्ञेच्या स्वाधीन वागून पतिव्रतेसारखे पतीचे भजन करीत असताना, पतीच्या पूर्वी गोपिकांना वंदन केल्यामुळे वेश्यापण येत असले तरी ते पत्करून, पति भगवान् श्रीकृष्ण यांचेच भजन करू. ७५.

**मग वेश्या होत्साता पतिव्रता । हे महानंदेची विशेषणसत्ता । काढोनि भक्तिसुखार्था । निजांगा जोडू ॥७६॥**

**वेदास परस्परोनि वरिले । हें आंगी वेश्यापण आलें ।**
**प्रियावीण दुजें हरपलें । म्हणोनि राहिलें पातिव्रत्य ॥७७॥**
**समजावया पति पतिव्रता । ''एकाकी न रमते'' या सिद्धांता ।**
**पाळोनि जीवन्मुक्तता । एऱ्हवी प्रियूचि प्राणेश्वरी ॥७८॥**

गुरुभक्तीचे रहस्य / द्वैत-अद्वैत

**द्वैतनिषधे अद्वैत । हा वनवासियांचा सिद्धान्त । अद्वैतहानि न करी द्वैत । हा सिद्धांत निगमाचा ॥७९॥**
**द्वैतचांदणे जंव जंव वाढे । तंव तंव चांदाची सत्ता उघडे । हें रहस्य रोकडें । गुरुभक्तीचे ॥८०॥**

अर्थ :- 'वेश्या असूनहि पतिव्रता होती' हा महानंदेचा विशेषगुण, तिच्यापासून प्राप्त करून घेऊन, भक्तिसुखाकरता. आम्ही आपल्या आंगी बाणून घेऊ. ७६. मायबाप वेदांची संमति न मिळतांच परस्पर पतीला वरिले म्हणून वेश्यापण आले खरे, पण माझ्या प्रियपतीवाचून दुसरे जगात काहीच नसल्यामुळे पातिव्रत्यहि कायम राहिले आहे. ७७. भगवान् पति कसा? व भक्त पतिव्रतापत्नी कशी? हे समजण्याकरता 'एकाकि न रमते' म्हणजे नुसत्या अद्वैत स्थितीत करमत नाही- या सिद्धान्ताला प्राप्त करून घेऊन आम्ही जीवन्मुक्तीचे सुख भोगतो. एऱ्हवी 'प्राणेश्वरी ही प्रिय पतीच असते.' त्यांच्यात यत्किंचितहि भेद जाणवला जात नाही. ७८. द्वैत खोटे आहे व अद्वैतच सत्य आहे' हा वनवासियांचा (सन्याशांचा) सिद्धान्त होय. पण ''द्वैत अद्वैताच्या यत्किंचितहि विरोधी नाही- ते त्याचे कार्य आहे.'' हा सिद्धांत वेदांचा आहे. ७९.चंद्राहून भिन्नइव दिसणारा त्याचा प्रकाश जितका वाढेल तितका चंद्रच स्पष्ट प्रकाशित होईल. हे गुरुभक्तीने प्राप्त होणारे रहस्यहि असेच आहे. ८०.

देव–गुरु / भक्ति-तुलना

**वैधी प्रधान गौण रत्ती । तेथ होय देवभक्ति । रागानुगा प्रधान गुरुभक्ति । विषयस्थिति पहिलेंचि नाही ॥८१॥**
**म्हणोनिया तीन्हीं । कवणिये रसा रसाळिणी । होऊनि नाचती नाचणी । ते ज्ञानेश्वर जननी दाखवी ॥८२॥**
**जय जय सद्गुरु प्रियकरा । जय जय सद्गुरु ज्ञानेश्वरा । निजालिंगनी मनोहरा । मेळवी माते ॥८३॥**
**मी तुमची कन्या यथार्थ । परी दुजे नाहींच विश्वांत । म्हणोनि आवडता कांत । तुम्ही ॥८४॥**
**येथ वेश्यापण मातें आलें । आणि आपणा कर्म न स्पर्शलें । दोघांचेही जाहलें । वेगळेपण ॥८५॥**
**आपण वेगळे पहिलें । मी आज जगावेगळे जाहलें । म्हणोनि समानत्व आलें । तुम्हां आम्हा ॥८६॥**
**परी पहिलेपासून वडिलपणा । स्वामी तुमच्या चरणा ।**
**तैसाचि मज परी कळणेपणा । करवी नमना (नमस्कराते) आजिचा ॥८७॥** (य २ उ १५४)

**॥ हरिः ॐतत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे प्रीतिनर्तने निरूप्याभिनय प्रियारूपपरिचयो नाम प्रथमः पदन्यासः ॥**

**॥श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

अर्थ :- ज्यात विहित धर्माचरण मुख्य राहते तशा गौण प्रेमाने देवाची भक्ति होते आणि केवळ प्रेमानुकुल अशा मुख्य प्रेमाने गुरुभक्ति होते. विषयवासना तर पहिलेच नाहीशी झालेली असते. ८१. म्हणून या तिन्ही भक्ति. (तस्यैवाहं, ममैवासौ, पतिपत्नी) कोणकोणत्या रसाला घेऊन संयुक्त झाल्या आहेत हे आता पुढे ज्ञानेश्वरमाउली दाखवील. ८२. हे प्रियकरा सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजा आपला जयजयकार असो. हे

सुंदरा आपल्या स्वरूपाशी आलिंगन देववून आपल्यात मला मिळवा. ८३. मी खरोखर तुमची कन्या आहे. पण विश्वात तुमच्यावाचून दुसरे कोणीच नसल्यामुळे माझे आवडते परमप्रिय पतीहि आपणच आहात. ८४. (द्वितीय यष्टीत हा ग्रंथ आहे. द्वितीय यष्टीच्याशेवटी श्रीमहाराजांनी सूचना प्रकरण जोडले आहे. त्यात त्यांनी स्त्रियांना स्पष्ट सूचना दिलेली आहे की स्त्रियांनी गुरूचे ठिकाणी पतिभाव मुळीच ठेवू नये. पतिभाव ठेवायचा असला तर कृष्ण किंवा शिवाचेच ठिकाणी ठेवावा. किंवा पतीलाच शिवकृष्णरूप मानावे. गुरूला पति मानले तर मात्र अत्यंत अधोगति होईल.) अशा रीतीने तुमच्याच ठिकाणी पितृभावना व पतिभावना ठेवल्यामुळे, माझ्याकडे वेश्यापणाचा दोष येऊन, मी जगावेगळी झाले. आणि आपल्या ठिकाणी कोणत्याहि कर्माचा स्पर्शच नसल्यामुळे आपणहि प्रथमपासूनच कर्मापासून वेगळे झाला आहात. ८५. आपण प्रथमपासूनच जगावेगळे आहां व मी आज जगावेगळे झाले म्हणून आपल्या दोघातहि समानत्व आले आहे. ८६. पण प्रथमपासून वडिलपणा, महाराज, तुमच्या ठिकाणी तसाच असून आज आपल्या कृपेने, मला उत्पन्न झालेली जाणीव, तुम्हाला नमन करायला लावते. ८७.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपाप्रसादाने ओवीछंदबद्ध झालेला प्रीतिनिर्तन या ग्रंथाच्या निरूपणीय अभिनयातील पतिपत्नी भक्तीतील पत्नीच्या रूपाचा परिचय करून देणारा हा पहिला पदन्यास समाप्त झाला.

०००

# पदन्यास २ रा

## ।। लालनाभिनय ।।

**।। श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमाउली समर्थ ।।**

**जय जय सकलकल्याणनिधाना । जय जय सद्‌गुरु करुणापिधाना ।**
**जय जय सद्गुरु मनमोहना । विश्वपते ।।१।।**
**माये तुझी कृपादृष्टी । पोटीं साठवोनि सृष्टी । स्वानंदशशांकप्रकाशपुष्टी । अवचट वाढवी ।।२।।**
**यास्तव सोडोनि अपवर्गचरण । आळंदीवल्लभे तुझे चरण ।**
**ध्यातां ध्यातां होय जनन । ते भाग्य पूर्ण मी म्हणे ।।३।।**
**आर्तादि तीहींच्या शेवटी । प्रिय जी या ज्ञानियां अधिष्ठी । तयांची ती भक्ति गोमटी । त्रिविध असे ।।४।।**
**'तस्यैवाहं' प्रथम जाण । 'ममैवासौ' द्वितीय म्हणोन । तिसरी ती सुंदर पूर्ण । 'स एवाहं' प्रत्यया ।।५।।**

अर्थ :- संपूर्ण कल्याणाचा ठेवा असलेल्या, करुणेने अगदी झांकून गेलेल्या, मनमोहना ! ब्रह्माण्डाच्या स्वामी सद्‌गुरुनाथा ! तुमचा जयजयकार असो. १. हे सद्गुरुआई, आपल्या कृपादृष्टीने पोटात सर्व विश्वच साठविले आहेस आता आत्मानंदरूप चंद्राच्या प्रकाशाची पुष्टी एकदम वाढीव. २. म्हणूनच मोक्षाच्या ठिकाणी प्रवृत्त होण्यापेक्षा, तुझ्याच चरणाचे ध्यान करतां करतां जन्म प्राप्त होणें, हेंच आळंदिवल्लभे ज्ञानेश्वर आई ! मी परमभाग्य समजतो. ३. आर्त-जिज्ञासु-अर्थार्थी या तिन्ही भक्तींच्या शेवटली, भगवंताला परमप्रिय असलेली व ज्ञान्यांच्या ठिकाणी असणारी, अशी जी भक्ति तीहि तीन प्रकारची आहे. ४. (१) 'मी भगवंताचा आहे' ही प्रथमभक्ति असून
(२) 'भगवान् माझा आहे' ही दुसरी भक्ति होय. (३) 'तोच मी आहे' अशा प्रत्ययाला घेऊन असणारी ती सुंदर भक्ति होय.५.

**ज्ञानज स एवाहंपण । उठवी सोहंवाचाऋण । प्रेमज स एवाहंपण । अनिर्वाच्य पूर्ण समाधिसम ।।६।।**
**प्रेमज स एवाहंपण याया । मृदु-मध्य-अधिमात्रतया । उपर्युक्त भक्तित्रया । मधुसूदनसंमति ।।७।।**
**प्रथमविषयीं साची । संमति श्रीमदाचार्यांची । षट्‌पदींमाजी तियेची । उपलब्धी कीरू ।।८।।**
**सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम् । सामुद्रो हि तरंगः॒ क्वचन समुद्रो न तारंगः ।। शंकराचार्य**

अभ्यास करावा. एकामागून एक करण्याचा प्रयत्न केल्यास जीवन्मुक्ति हे फळ प्राप्त होत नाही असे भगवान् वसिष्ठांनी योगवासिष्ठात सांगून ठेवले आहे. १८. विवेकावाचून मनामध्ये ज्या कामादि वृत्ती उसळतात, त्यांना वासना हे नांव आहे; असे स्वामी विद्यारण्य म्हणतात. २०.

**योगें चित्तवृत्ति निरोधिता । निरोधसंस्कारे तत्वतां । वासनेची वार्ता । न सांपडे ॥२१॥**
**हा मार्ग योग्य असोन । परी बळे रोधितां मन । तें सूक्ष्म वासना घेऊन । निरोध पावे ॥२२॥**
**जीवन्मुक्तिविवेकांत । मनोनाश विद्यारण्योक्त । आणि तेचि वदती पंचदशींत । की वासना उठती प्रारब्धें ॥२३॥**
**'तस्य तावदेव चिरं' या श्रुति । अभुक्त न सुटे प्रारब्धस्थिति । हा स्वग्रंथविरोध स्वामिमतीं । दृढतर आहे ॥२४॥**
**समाधींत राहिलीया । प्रारब्धभोग भोगील काया । तरी मग प्रेता तया । प्रारब्ध न कां ॥२५॥**

अर्थ :- अभ्यासयोगाच्या योगाने चित्ताचा निरोध केला असता निरोधसंस्कारामुळे वासनेची वार्ताहि सांपडत नाही. २१. हा मार्ग योग्य आहे खरा; परंतु बळजबरीने मनाचा निरोध केला असता ते सूक्ष्म वासना घेऊनच निरुद्ध होते. २२. विद्यारण्यांनी जीवन्मुक्तिविवेकात 'मनोनाश करावा' असे सांगितले आहे. आणि तेच पुन्हा 'प्रारब्धामुळे वासना उठतात' असें पंचदशीत म्हणतात. २३. आणि 'तस्य तावदेव चिरं' - भोगावाचून प्रारब्ध संपत नाही, अशी ही श्रुति असल्यामुळे स्वामींच्या मतात या मताशी विरोध येतो. २४. समाधिस्थितीत राहून जर शरीराला प्रारब्ध भोग होतील (असे मानले तर) तर मग 'प्रेताला प्राब्धभोग होतात' असे कां मानूं नये? २५.

**प्रेतासी प्रारब्ध मानतां उघडे । तरी प्रारब्ध संपतां देह पडे । हे बोलणे फोल फुडे । जाहलें कीं नाहीं ॥२६॥ तें प्रारब्धनाशनासाठीं । ज्ञानानंतर जीवयत्नकोटी । तरी कर्तृबुद्धि गोमटी । सुटेल केवीं ॥२७॥(य२उ१५६) ऐसें कचाटी सांपडोन । आनंदें स्थिर नोहे मन । यालागीं तें प्रेमाधीन । कौतुकें कीजें ॥२८॥ हे न मम पदरीची वाणी । मुचकुंदा बोलिले चक्रपाणी । आणि तातही मधुरवचनीं । ऐसेचि वदती ॥२९॥**

**''युञ्जानानामभक्तानां प्राणायामादिभिर्मनः ।**
**अक्षीणवासनं राजन् दृश्यते पुनरुत्थितम्''॥ श्रीमद्भागवत.**
**प्राणायामादियोगे करून । माझेठायीं लावितां मन ।**
**विनाभक्ति वासना क्षीण । नव्हे म्हणून पुनः उठे ॥३०॥**

अर्थ :- प्रेताला प्रारब्धाचे सुखदुःखादि भोग होतात असे मानले तर मग 'प्रारब्ध संपल्यानंतर देह पडतो' हे बोलणेच व्यर्थ होते. २६. त्या प्रारब्धाचा नाश करण्याकरता ज्ञानानंतरहि जीवाने नानाप्रकारचे प्रयत्न करावे असे असेल तर त्याची कर्तृत्व बुद्धि कशी सुटेल ? २७. अशा कचाट्यात सांपडून मग आनंदानें स्थिर होत नाही म्हणून ते भगवत्प्रेमाच्या स्वाधीन करावे. २८. माझे हे बोलणें माझ्या पदरचे नसून भगवंतानेच मुचकुंद राजाला सांगितले आहे. आणि श्री ज्ञानेश्वर माउलीहि गोड शब्दानें हेच सांगते. २९. प्राणायमदि योगसाधनानें भगवंताचे ठिकाणी मन लावले असता भगवद्भक्तीवाचून विषयवासना क्षीण होत नाही म्हणून ते पुनः पुनः उसळते. ३०

**ज्ञान योग बरोबरी । अभ्यासावा ही वसिष्ठोक्ति खरी ।**
**परंतु एकाएका उपायोपरी । त्याही मनोनाश बोलिला ॥३१॥**
**'द्वौ क्रमौ चित्तनाशाय योगो ज्ञानं च राघव । योगस्तद्वृत्तिरोधो हि ज्ञानं सम्यगवेक्षणम् ॥'** (योगवासिष्ठ)
**रामा, मनोनाशाकारण । योग आणि ज्ञान । योगश्चित्तवृत्तिनिरोधन । ब्रह्म जाणणें ज्ञान कीं ॥३२॥**
**परी ज्ञानसमयीं वृत्तिनिरोधा । कर्तृमति होय प्रसिद्धा । यालागीं हरिभक्तिपदा । आश्रयावे ॥३३॥**
**प्रेम लागतां भगवंतीं । तिकडेचि धांवेल वृत्ति । सकल निरोधप्रतीति । सप्रेम भगवंतीं घडेल ॥३४॥**
**येथ वाल्लभनिरोधलक्षण सन्मानितां । अयोग्य न वाटे मम चित्ता ।**
**आणि तातोक्तिसामर्थ्यसत्ता । एवढी मज ॥३५॥**

अर्थ :- ज्ञान आणखी योग यांचा बरोबरच अभ्यास करावा असे भगवान् वसिष्ठांचे वचन आहे

खरे; परंतु एका एका उपायाने मनोनाश होऊ शकतो असेहि त्यांनी सांगितले आहे. ३१. रामचंद्रा, मनोनाश करण्याकरता योग व ज्ञान असे दोन मार्ग आहेत. चित्तवृत्तींच्या निरोधाला 'योग' म्हटले जात असून, योग्य विचार करणे याला 'ज्ञान' म्हणतात. ३२. पण ज्ञानाच्या वेळी वृत्तींचा निरोध करताना वृत्ति कर्तृत्वयुक्त होते म्हणून भगवंताच्या चरणांचा आश्रय करणेच चांगले ! ३३. भगवंताचे ठिकाणी एकदा प्रेम जडले असता सर्वच वृत्ती भगवंताकडे धावतात. व अशा रीतीने सहजच भगवंताचे ठिकाणी सर्व वृत्तींचा निरोध झालेला अनुभवास येतो. ३४. येथे वल्लभमतातील चित्तनिरोधाचे लक्षण स्वीकारणे माझ्या मनाला अयोग्य वाटत नाही. व भगवान ज्ञानेश्वरमाउलीच्या वचनाने एवढे पाठबळहि मला आहेच. ३५.

**''कां जे यया मनाचेंनि एक निकें । जें देखले गोडीचिया ठाया सोके ।**
**म्हणोनि अनुभवसुखचि कौतुकें । दाखवित जाइजें ॥''(ज्ञाने.६.४२०)**
**''किंबहुना पांडवा । हा अग्निप्रवेश नित्य नवा । भ्रताराविण करावा । तो हा योग ॥''(ज्ञाने.१२.६६)**
**''म्हणोनी येर ते पार्था । ते नेणतीचि हे व्यथा । जे माझिये भक्तिपंथा । वोठंगले ॥''(ज्ञाने.१२.७५) (य २ उ १५७) एवं योगदुःशक्ये भक्तिप्रधान । तातवचनानुमोदन ।**
**यालागीं मनोनाश संपूर्ण । भगवत्प्रेमें सहजचि ॥३६॥**
**मन निरोधी सूक्ष्म वासना । त्याही सहज होय क्षीणा । समाधि व्युत्थाना । अनुकूल भक्तौ ॥३७॥**
**कामक्रोधलोभाभिमान । सकल वासनांची सांठवण ।**
**यालागींही धरितां भगवच्चरण । वासना क्षीण सहजचि ॥३८॥**
**प्रियनंदननंदनोक्ति । बोधितां हे येणें रीती । सूत्रप्रमाणप्रतिपत्ति । म्हणोनियां ॥३९॥**
**''तदर्पिताखिलाचारः सन् कामक्रोधाभिमानादिकं तस्मिन्नेव करणीयम्' (नारदभक्तिसूत्र)**
**ज्ञानें आत्मनिवेदन । तैं सकर्तृकाखिलाचारसमर्पण ।**
**परी विकार घेऊनि सोहंपण । प्रारब्धभुंजन भासविती ॥४०॥**

अर्थ :- (या मनाचे हे एक चांगले आहे की त्याला जेथे गोडी लागते तेथे ते चिकटते. म्हणून त्याला अनुभवाचे सुख दाखवित जावे. (ज्ञाने.४२०) किंबहुना अर्जुना, योग म्हणजे भ्रतार नसताना अहर्निश करावा लागणारा अग्निप्रवेशच होय. ६६. ज्ञाने.) माझ्या भक्तिपंथाचाच आश्रय करणारे दुसरे जे योगियांवाचून भक्त आहेत त्यांना योगादिकांचे दुःख भोगावे लागत नाही. याप्रमाणे योगाचे अनुष्ठान अत्यंत कष्ठसाध्य असल्यामुळे भक्तीचे प्राधान्य सिद्ध होते. त्याला ज्ञानेश्वरमाउलीनेहि अनुमोदन दिले आहे. म्हणून संपूर्ण मनोनाश भगवंताच्या प्रेमभक्तीने सहज साधतो. ३६. मनाचा निरोध करतांना मनात ज्या सूक्ष्म वासना राहून जातात त्याहि भक्तिप्रेमाने सहज क्षीण होतात. म्हणून भक्तीमध्ये समाधि व व्युत्थान यांना त्या अनुकूलच होतात. ३७. काम म्हणजे विषयवासना, क्रोध, लोभ, अभिमान, हे विकार .म्हणजे सर्व वासनांची सांठवण होय.- प्रेमाने भगवंताच्या चरणांचा आश्रय केला असता सहजच वासना क्षीण होतात. ३८. याविषयी प्रिय जो भगवान् त्याचा नंदन जो ब्रह्मदेव, त्याचा नंदन नारद यांची वचनोक्ति अशी सांगत असून ती सूत्ररूपाने प्रमाण आहे. ३९. संपूर्ण वैदिक व लौकिक आचरण भगवंताला समर्पण करून काम, क्रोध लोभ, अभिमानादिक विकारहि त्याचेच ठिकाणी करावेत. प्राप्त झालेल्या ब्रह्मज्ञानाने परमेश्वराला 'अहंता-ममता' समर्पण झाली असतां आपला सर्व लौकिकवैदिक आचार भगवंताला समर्पण होतो. तरी पण प्रारब्धाने जे कामक्रोधलोभादिक विकार उत्पन्न होतात. ते सोहं या आत्मप्रत्ययामुळे आपल्याच ठिकाणी भासून प्रारब्धाचा प्रत्यय आणून देतात. ४०.

**तो भुंजनाभिभवो सोहंविकारार्पिता । म्हणोनि ''तदर्पिताखिलाचार सन्''या अर्था ।**
**ज्ञानसंपन्न होत्साता । कामक्रोधादि तत्वतां तेथचि कीजे ॥४१॥**
**जैसें कीं प्रियेचें मन । प्रियावरी जडतां पूर्ण । मग जंव जंव निषेधिती जन । तंव तंव अधिक जडे ॥४२॥**
**कीं सकल पदार्थ । खादाडा पथ्यसमयीं आठवत ।**
**तैसे भगवंती जडतां चित्त । विकार उठतां अधिकचि जडे ॥४३॥**

**म्हणोनि कामक्रोधलोभमोहाभिमान । प्रभुसाठींचि करावा धारण ।**
**हे देऊनि इतिहासप्रमाण । तातही वदले ॥४४॥**
**''तैसाचि गोपिकांसी कामें । तया कंसा भयसंभ्रमें । येरा घातकां मनोधर्मे । शिशुपालादिकां ॥४६९॥**
**जे अभिमान वाहती अंगी । आम्ही हरीचे भूषावयालागीं । जे माझेनि लोभें जगीं । लोभिये जाहले ॥३६२॥**ज्ञा.अ.९
**अहो विकारही असतां । जया रक्षणें भगवंता । तयाची निर्विकारता । मोडेल कवण ॥४५॥**

अर्थ :- पण कामक्रोधलोभादिक विकार भगवंताचे ठिकाणी केले असता या प्रारब्धप्रत्ययाचा अभिभव होतो. (कळेनासे होतात). याप्रमाणे हा प्रारब्धभोगाचा अभिभव, भगवंताचे ठिकाणी ज्ञानानंतर सोहंरूपाने उठणारे विकार अर्पण केले असता होत असल्यामुळे 'ब्रह्मज्ञानसंपन्न होऊन संपूर्ण आचारसमर्पणपूर्वक कामक्रोधादिक विकारहि भगवंताचे ठिकाणीच करावेत' असे सांगितले आहे. ४१. ज्याप्रमाणे स्त्रीचे मन आपल्या प्रिय पुरुषावर एकदा पक्के जडले म्हणजे लोक जसे जसे नावे ठेऊन बोलतील तसे तसे तिचे मन त्या प्रिय पुरुषाकडे अधिकच लागते. ४२. किंवा ज्याप्रमाणे खादाड माणसाला पथ्य करण्याचा प्रसंग आला असता खाण्याचे अनेक सुरेख पदार्थ आठवतात त्याप्रमाणे भगवंताचे ठिकाणी लागलेले चित्त, विकार उठले असता अधिकच जडते. ४३. म्हणून काम-क्रोध-लोभ-मोह-अभिमान हे सर्व विकार परमेमश्वरप्रीत्यर्थच उठू द्यावे, असे इतिहासप्रमाण देऊन ज्ञानेश्वरमाउलीनेही सांगितले आहे. ज्ञानेश्वरमाउली म्हणते ४४. - गोपिकांनी कामविकाराच्या द्वारा, कंसाने भयविकाराच्या द्वारा, व घातक अशा शिशुपालदिकांनी द्वेषविकाराच्या द्वारा भगवंताचे ठिकाणी मन दृढ जडविले. 'आम्ही हरीचे भूषणभूत आहोत' असा अभिमान जे धारण करतात, किंवा भगवंताच्या लोभाने भगवत्प्रीत्यर्थच जे लोभी दिसतात, त्यांचे चित्त भगवंताकडे दृढ जडले जाते. विकार असूनहि जर त्याचे भगवंताला रक्षण करावयाचे आहे तर त्याची निर्विकार स्थिति कोण मोडू शकेल ! ४५.

**मेलियाही अवचित । रक्षणपण करील अमृत । तरी तया रोगग्रस्त । कवण समर्थ करावया ॥४६॥**
**म्हणोनि योगकष्टावीण । सकल देती सद्गुरुचरण । ऐसें वदले वामन । तें श्लोकार्थप्रमाण ऐकावें ॥४७॥**
**(य२उ१५८)**

वामन पंडितांचा श्लोक :-

**सफळ सकल योग श्रीहरीच्याच पायीं । श्रम मग करणें कां आणिकांहीं उपायीं ॥**
**ओवी - म्हणौनि भगवंतीं । वाढतां दृढ भक्ति । साधे ज्ञानविरक्त्युपरति । प्रमाण भागवतीं ये विषयी ॥४८॥**

श्रीमद्भागवत श्लोक :-

**वासुदेवे भगवति भक्तियोगः प्रयोजितः। जनयत्याशु वैराग्यं ज्ञानं यत्तदहैतुकम् ॥१॥**
**आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रन्थाऽप्युरुक्रमे । कुर्वन्त्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरिः ॥२॥**

ओवी -

**'ज्ञान' म्हणजे ब्रह्मात्मैक्यता । 'वैराग्य' म्हणजे मनोनाश वासनाक्षीणता ।**
**हे भगवंतीं भक्ति योजितां । प्राप्त होती ॥४९॥**
**म्हणौनि आत्मारामहि मुनी । भक्ति करिती हेतु सांडोनी । लुब्धलें जे गुणीं । श्रीहरीच्या ॥५०॥**

अर्थ :- अकस्मात् मृत्यू येऊनहि जर मनुष्य अमृत पिऊन जिवंत झाला तर त्याला पुनः रोगपीडित करण्यास कोण समर्थ आहे! ४६. योगसाधनांचे कष्ट पडू न देता सद्गुरुंच्या चरणसेवेने सर्वच प्राप्त होऊ शकते, असे वामन म्हणतात. तो श्लोक येथे प्रमाण देत आहे. ४७. श्रीगुरुंच्याच चरणसेवेने सर्व योगाभ्यासाचे फळ मिळते. मग दुसऱ्या उपायांचे श्रम कशाला करावयाला पाहिजेत ? म्हणून भगवंताचे ठिकाणी दृढ प्रेमभक्ति जडली असतां जीवब्रह्मैक्यरूप ज्ञान, वैराग्य आणि उपरति म्हणजे शांति हे सर्व साधतात. याविषयी भगवतवचन प्रमाण आहे. ४८.

श्लोकार्थ :- भगवान् वासुदेव यांचे ठिकाणी भक्तियोगाने दृढ चित्त जडले असता त्याला लौकरच वैराग्य व अपरोक्षज्ञान उत्पन्न होते. ॥१॥ आत्मस्वरूपाच्या ठिकाणी रत असल्यामुळे ज्यांच्या हृदयातील

संपूर्ण चिज्जड ग्रंथी सुटल्या आहेत असे मुनी देखील भगवंताची निष्काम भक्ति करतात; असा परमात्मा गुणसंपन्न आहे ॥२॥

ज्ञान म्हणजे जीवब्रह्मैक्यरूप एकता व वैराग्य म्हणजे मनोनाश आणि वासनेची क्षीणता या दोन्ही गोष्टी भगवतांची भक्ति केली असता प्राप्त होतात ४९.म्हणून आत्मस्वरूपाच्या ठिकाणी रममाण होणारे मुनीहि, भगवंताच्या गुणांच्या ठिकाणी लुब्धहोत्साते भगवंताची निष्कामभक्ति करतात. ५०.

वामन पंडितांचा श्लोक :-

**आत्माराम असे शुकादिक मुनी ज्यांचे अविद्यामय । ग्रंथी सर्वहि सूटले जितचि जे मुक्त स्वयें अद्वय ॥**
**भक्ति श्रीहरिची उगीच करिती तीही निमित्ताविण । कीं मुक्तीहुनि गोड फार असती श्रीमाधवाचें गुण ॥**
**हे वामनवाणी । त्रिविक्रमपणीं । मुनिवरमनीं । संस्थान करी ॥५१॥**
**असोत या प्रमाण युक्ती । सांपडतां सज्ञान भक्ति । सहजचि जीवन्मुक्ति । हातां चढे ॥ ५२॥**
**परी जाहलिया ज्ञान । अनिर्वाच्य प्रेमस्तब्धपण । आगमना आधी सोहंपण । दृढ उठे ॥५३॥**
**ते बुद्धितादात्म्य विकारासहित । दिवसेंदिवस भगवत्यर्पित ।**
**म्हणौनि 'तस्यैवाहं' येथोनि उमटत । अनिर्वाच्य माधुर्याप्त भक्ति ॥५४॥ भगवंत मातापिता । हे बरोबरी आवडतां । ज्ञानाहंतासंकटीं भगवंत पिता । माता आळवितां आवडीनें ॥५५॥ (य२उ१५९)**

अर्थ :- ज्यांच्या चिज्जडमय अविद्याग्रंथी सुटल्यामुळे जे आत्मस्वरूपाच्या ठिकाणी रममाण असतात, म्हणून जे अद्वैत ब्रह्मस्वरूप होऊन जीवन्मुक्त झाले आहेत, असे शुकादिक मुनीहि, 'प्राप्त झालेल्या मुक्तिसुखापेक्षाहि भगवंताचे गुण अधिक गोड आहेत' असे समजून स्वाभाविकच भगवंताची निष्काम भक्ति करतात. ज्याप्रमाणे वामनाने बलीच्या डोक्यावर पाय देऊन त्याला पातळात घातले (व तिन्ही लोकात विक्रम केला) त्याप्रमाणे सर्व साधनांच्या डोक्यावर पाय ठेऊन त्यांना निरर्थक करणारी ही वामनाची वाणी श्रेष्ठ भगवद्भक्त मुनींच्या अंतःकरणात नेहमी वास करीत असते. ५१. असो, याप्रमाणे युक्ति सांपडली असता ज्ञानासह भक्ति हाती येते व जीवन्मुक्तस्थिति सहज बाणते. ५२. ज्ञान प्राप्त झाल्यानंतर आत्मप्रेम अनिर्वाच्य व स्तब्ध असते, म्हणून सगुण भगवंताचे प्रेम अन्तःकरणात प्रकट होण्यापूर्वी 'सोहं' वृत्तीचे स्फुरण होत राहते. ५३. हे विकारांसहित झालेले बुद्धीचे ऐक्य दिवसेंदिवस भगवंताला अर्पण झाले असता तेथून शेवटी अनिर्वाच्य अशा माधुर्य प्रेमभक्तिपर्यंत वाढणाऱ्या 'तस्यैवाहं' भक्तीला आरंभ होतो. ५४. भगवंताचे ठिकाणी मातृपितृभाव एकदम बरोबरच ठेवावा, असे आवडल्यास सगुण भगवंताच्या प्रेमात विघ्न करणाऱ्या अहंतेचे संकट उठले असता भगवंताला पिता समजून त्याचा धावा करावा व प्रेमाने आळवताना मातेची भावना ठेवावी. ५५.

**परी गन्तुरभिमानलक्षण । दिवसें दिवस बाळपण ।**
**म्हणौनी आधी पिता भगवान । पुढे माता तीचि होय ॥५६॥**
**करुणारसाचा आविर्भावो । भगवंतीं मातृपितृभक्त्युद्भवो ।**
**पिता शंकर माता माधव । कीं माता शंकर पिता हरि ॥५७॥**
**अथवा माता रमा पार्वती । पिता गरुडवाहन पशुपति ।**
**किंवा दोन्ही मिळोनी सद्गुरुमूर्ती । माता पिता एकला ॥५८॥**
**सुकुमार सद्गुरु रूपडें । मुखी प्रेमस्तन्य घालील कोडें । यालागी रात्रंदिवस रडे । याचि आशे ॥५९॥**
**केव्हां सद्गुरूते बाहे । हे तात, कृपा करी लवलाहे । संकट नसोनिही पाहे । संकट पुढे ॥६०॥**

अर्थ :- ज्याचा अभिमान क्षीण होत जातो त्याचे हेच लक्षण आहे की, त्याला आपले जाणतेपण प्रगट करावेसे वाटत नाही; म्हणूनच जाणतेपणाच्या अभिमानामुळे भगवान् आपले प्रेम कमी करील अशी भीति बाळगण्याकरता भगवंताचे ठिकाणी प्रथम पितृभावना करावी लागते. व अहंता सपशेल नष्ट झाली म्हणजे तेथेच त्याचे ठिकाणी मातृभावना होऊ लागते. ५६. अन्तःकरणात करुणरसाचा आविर्भाव झाला असता भगवंताचे ठिकाणी मातृपितृप्रेमभक्तीचा उद्भव होतो तेव्हा शंकराला पिता व श्रीहरीला माता असेहि मानण्यात

येते. ५७. किंवा पार्वती, रमा यांना माता समजून शिव, विष्णु यांना पिता समजावे. किंवा मातृपितृ दोन्ही भाव एका सद्‌गुरुच्याच ठिकाणी करावेत. ५८. (असे झाले असतां) सुकुमार सद्‌गुरुमाउलीने मला प्रेमदूध पाजावे अशा इच्छेनें तो रात्रंदिवस रडतो. ५९. 'हे तात, लवकर कृपा करा.' असे म्हणून प्रेमाने सद्‌गुरूला आळवतो. व संकट नसूनहि संकटाची कल्पना करतो. ६०.

**जैसी प्रियाची आठवण । विरहिणीस होतां पूर्ण । प्रियाचें अनागमन । संकट वाटे ॥६१॥**
**नातरी भूक नसोनी पोटी । बाळ आक्रंदे मातृभेटी । कांहीच भय नसतां नेहटी । थरथर कांपे ॥६२॥**
**उगीच माती घाली मुखीं । बेचव लागता होय दुःखी । मग रडोनी म्हणे शेखीं । कडिये घेई मज माये ॥६३॥**
**तेवी संसार ज्ञानें हरपला । तथापि ज्ञानाहंकारबागुला ।**
**कल्पोनि रडत बाहे वहिला । 'श्रीगुरो तात' म्हणोनि ॥६४॥**
**मी ज्ञानी म्हणोनी ज्ञानाभिमान । ऐसा न उठतां जाण । तोचि मी गुरुपुत्र म्हणोन । सुखद उठे ॥६५॥**

अर्थ :- ज्याप्रमाणे प्रिय पति दूर गेला असता त्याची आठवण होऊन विरहिणी पतिव्रता स्त्रीस 'तो अजून आला नाही' याचेच संकट वाटते. ६१. किंवा लहान मुलगा पोटात भूक नसतानाहि केवळ आईने घ्यावे म्हणून मोठ्याने रडतो व काही भीति वाटली नसतांहि थरथर कापतो. ६२. आपणच तोंडात माती घालतो. ती माती बेचव लागली असता पुन्हा मोठ्याने रडतो व रडत रडत आईला 'मला कडेवर घे' असे म्हणतो. ६३. त्याप्रमाणे आत्मज्ञानाने संसाराचा प्रत्यय नाहीसा झाला तरी आत्मज्ञानाच्या अहंकाराला बागुलाप्रमाणे भिऊन 'तात, श्रीगुरो', असे म्हणत त्यांचा धांवा करतो. ६४. मग 'मी ज्ञानी झालो' असा ज्ञानाभिमान न उठतां तोच 'मी श्रीगुरूचा पुत्र आहे' असा सुखकर अभिमान उठतो. ६५.

**शिवो भूत्वा शिवं यजेदिति । स्वयें बोलिली आहे श्रुति । आणि आळंदीवल्लभोक्ति । ऐसीचि असे ॥६६॥**
**"शिव शिवा सद्‌गुरु । तुजला गूढा काई करू । एकही निर्धारू धरू । देतासीना ॥१॥**
**आम्ही निखिळ मा तुझे । वरी लोभें म्हणसी माझे । हें पुनरुक्त साजे । तूंच म्हणुनी ॥२॥" अमृ.**
**केव्हां काम क्रोध अरी । मिथ्याचि कल्पोनि कुसरी । सद्गुरूस मानुनी हरी । धांव ताता म्हणतसे ॥६७॥**
**केव्हां दुर्घट अत्यंत मदन । ज्ञान-तपांत करील विघ्न ।**
**ऐसे कल्पोनि श्रीगुरुकारण । म्हणे ते तात, हे शिव, धांवा ॥६८॥**
**संकष्ट पुढें कल्पितां कल्पितां । श्रम पावोनि क्रोध येतां ।तरी सद्गुरूस म्हणोनि माता । आक्रंदे सुखे ॥६९॥**
**कैवल्यभातुकें झुगारूनि । माय माय म्हणोनि । आक्रंदे वेडा होऊनी । वत्स जैसें ॥७०॥**

अर्थ :- 'आपण शिवस्वरूप होऊन शिवाचे भजन करावे' असे श्रुति सांगत आहे आणि आळंदिवल्लभ श्रीज्ञानेश्वर महाराज यांचेहि म्हणणे असेच आहे. ६६. हे शिवशक्तिस्वरूपा सद्‌गुरुनाथा, काय करावे; तुमचे रूप इतके गूढ आहे की, तुम्ही आपल्या स्वरूपाविषयी एकहि निश्चय करू देत नाही ।।१।। केव्हा कामक्रोधांना लटकेच शत्रू समजून व सद्‌गुरुस श्रीहरि समजून पितृभावनेने 'हे ताता, धावा' असा श्रीगुरुचा धावा करतो. ६७. केव्हा 'दुर्धर असा कामविकार ज्ञानात विघ्न करील' अशी कल्पना करून 'हे तात, हे शिव' असे म्हणून सद्‌गुरूचा धावा करतो. ६८. अशी संकटपरंपरेची कल्पना करून, श्रम पावून, क्रोधाने 'आई आई म्हणत, श्रीगुरूचा धावा करतो. प्रेमाने श्रीगुरुकरता रडतो. पण तेव्हा रडण्याने दुःख होत नाही हे 'सुखे' या शब्दाने दाखविले आहे. ६९. प्राप्त झालेले मोक्षसुख झुगारून देऊन, श्रीगुरुप्रेमात वेडा होऊन 'माय,माय' म्हणत गाईच्या वत्साप्रमाणे श्रीगुरुकरता हंबरडा फोडतो. ७०.

**सद्‌गुरुजननीस्मरणापुढें । जया वत्सपण पशुत्वही आवडे ।**
**शब्द विसरूनि अव्यक्त हंबरडे । फोडोनि हृदयारण्य गर्जवी ॥७१॥ (य२उ.१६०)**
**सद्गुरूची कृपादृष्टि । भरली आहे सर्व सृष्टि । तया दृष्टीचिया तळवटी । कूर्म होय सृष्टीएवढा ॥७२॥**
**कूर्मदृष्टीनें समाधान । तेथ न स्पर्शे मुख स्तन । यालागीं कूर्मत्व सोडोन । वांसरू होय ॥७३॥**
**मग श्रीगुरुजननीस्तनपीयूषधारा । घ्यावया प्रेमवृत्ति मुख पसारा ।**
**परी कडिये बैसोनि सुखसारा । घ्यावया होय बाळक ॥७४॥**

**कूर्मत्वीं फसविले दृष्टिं पोषुनि । वत्सत्वी फसविलें दुध पाजुनी ।**
**यालागीं पुढती लेकरूं होवोनि । क्रोधेंकरूनि आक्रंदे ।।७५।।**

अर्थ :- श्रीगुरुजननीचे स्मरण करीत असताना तो पशुप्रमाणे वत्सत्वहि आवडीने घेतो आणि अव्यक्त हंबरडे फोडून अन्तःकरणरूपी अरण्य गर्जून सोडतो. ७१. श्रीगुरूची कृपादृष्टि सर्वत्रसृष्टीत भरली असून त्या सर्व कृपादृष्टीचा लाभ घेण्याकरता 'मी सृष्टिएवढा कूर्म आहे' अशी भावना करतो. ७२. तेथे कूर्माच्या नुसत्या कृपादृष्टीचा लाभ मिळतो, स्तनाला मुखाचा स्पर्श होत नाही. म्हणून समाधान न वाटून, तो कूर्मत्वाची भावना सोडून वासरू होतो. ७३. मग श्रीगुरुजननीच्या प्रेमस्तनातून निघणाऱ्या दुग्धधारा घेण्याकरता प्रेमवृत्तिरूप मुख पसरतो. पण नंतर कडेवर बसून सुख घेण्याकरता बालक होतो. ७४. कूर्म झालो असतां प्रेमदृष्टीने पोषण करून फसविले. वत्स झालो असता दूध पाजून फसविले. म्हणून पुनः लेकरूं होऊन क्रोधाने आक्रंदन करून श्रीगुरु आईचा धावा करतो. ७५.

**वैकुंठ खेळणें उमजला । कैवल्यभातुकिया कंटाळला । यास्तव क्षोभें रडों लागला । मायमाय म्हणोनि ।।७६।।**
**रांगत जावयाकारण । दिशाचि नाही म्हणोन । ठायींच अचल राहोन । सद्‌गुरुनामें आक्रंदे ।।७७।।**
**तया करुणाकल्लोळांपुढे । ब्रह्मास सद्‌गुरु होणे घडे । हांसे तें रोकडे । दास्यचि करी ।।७८।।**
**हांसतां न दे गुरुदेवा कष्ट । दास्यचि करी अचाट । हाचि काम नीट । हृदयीं धरी ।।७९।।**
**अथवा सोहंक्रोधविकार येतां रडे । बाळ होवोनि पायां पडे । येणेचि रीति रोकडे । वागृण नाशी ।।८०।।**

अर्थ :- वैकुंठ हे खेळणे आहे हे जाणल्यामुळे व मग कैवल्यसुखालाहि कंटाळल्यामतुळे क्षुब्ध होऊन 'आई आई' म्हणून श्रीगुरुजननीच्या नांवाने रडूं लागतो. ७६. आपण होऊन श्रीगुरुकडे रांगत जावे तर ज्ञानदृष्टीने सर्वव्यापक आत्मस्वरूपाचे ठिकाणी दिशाच नाहीत हे जाणून ठिकाणाच्या ठिकाणीच अचल राहून श्रीगुरूच्या नांवाने हंबरडा फोडतो. ७७. अशा त्याच्या अत्यंत करुणास्पद रडण्यामुळे निराकार परब्रह्मालाहि साकार सद्‌गुरुरूपाने प्रकट व्हावे लागते. आणि श्रीगुरुजननी प्रकट झाल्यामुळे त्याला हंसू आले तरी तो सेवाच करतो. ७८. हंसू आले असता देखील गुरुदेवाला कष्ट न देता, त्यांची पराकाष्टेची सेवा करतो व श्रीगुरूची अशी अखंड सेवा करावी हीच एक मनात इच्छा धरून ठेवतो. ७९. अथवा सोहं-वृत्तीशी ऐक्य पावून क्रोधविकार उठला असता रडतो व बाळ होऊन पाया पडून क्षमा मागतो. अशा रीतीनेच वागृण नाहीसे करतो. ८०.

**मातेस यावी आठवण । म्हणोनि ब्रह्मानंदजळीं मीन ।**
**अथवा कृपादृष्टि-चंद्रामृतपान । कराया कूर्म चकोरपणें ।।८१।।**
**कीं भगवन्मुखींचा लाळ । आंगी लागतां होई निर्मळ । याचि इच्छेंकरून केवळ । वत्स होय ।।८२।।**
**किंवा कडियेवरि बैसोन । तुच्छ करीन कैवल्यादिस्थान । याचि इच्छेंकरून । लेकरूं होय ।।८३।।**
**घडिघडि श्रीगुरूतें । म्हणे धांव अंबे जगन्माते । घडि एक चित्तातें । ऐसेंचि मानी ।।८४।।**
**मियां सद्गुरुस जगन्माता । म्हणोनि बाहतां । जगास तत्वतां । स्तन्य पाजील ती ।।८५।।**

अर्थ :- श्रीगुरुजननीला आपली वारंवार आठवण व्हावी म्हणून ब्रह्मानंदरूपी जलात मासा होऊन राहतो अथवा श्रीगुरुच्या कृपादृष्टीचे किंवा चंद्रामृताचे सेवन करण्याकरता कूर्म व चकोर होतो. ८१. किंवा 'भगवंताने प्रेमाने (गाय होऊन) चाटले असता भगवंताच्या मुखाचा लाळ अंगाला लागेल व माझे सर्व शरीर शुद्ध निर्मळ होईल' अशी इच्छा धरून तो वत्स होतो. ८२. 'श्रीगुरुजननीच्या कडेवर बसण्याच्या सुखाने कैवल्यादि सुखेही तुच्छ वाटतील', या इच्छेने तो लेकरू होतो. ८३. पण क्षणोक्षणी श्रीगुरूला जगन्माते, अंबे, जननी, धांव' असे म्हणत राहतो आणि क्षणभर चित्तात असेहि वाटते कीं, ८४. मी श्रीगुरूला जगन्माता म्हटले असता ती सर्व जगाला स्तनपान करवील. ८५.

**किंवा जगास पाजितां रोकडें । दुर्लक्ष होईल माझेकडे । यालागीं उघडपणें रडे । माझी माय म्हणोनि।।८६।।**
**"जय जय वो शुद्धे । उदारे प्रसिद्धे । अनवरत आनंदे । वर्षतीये' ।।**
**म्हणोनि अंबे श्रीमंते । निजजनकल्पलते । आज्ञापी माते'' । इत्यादि तातोक्ति ।।८७।।**

**ऐसें ऐसें म्हणोनि । रडतां विसरे दिवस रजनी । कीं श्रीगुरु ओसंगा घेऊनि । बैसतां तो हांसे ॥८८॥**
**एवं हांसोन रडोन । रंजवी गुरुमाताभगवतीचें मन । एऱ्हवीं याचन । कांहींचि नाहीं ॥८९॥**
**या बाळाचें ऐसें बळ । मायेस रंजवोनी रंजे प्रबळ । बाळ माता, की माय बाळ । भेद न कळे॥९०॥**
**(य२उ१६१)**

अर्थ :- किंवा याप्रमाणे सर्व जगास स्तनपान देताना माझ्याकडे दुर्लक्ष होईल, असे वाटून तो 'माझी माय' म्हणून उघडपणे रडतो. ८६. अशा नाना भावना करीत असतां रात्र आणि दिवस यांचा देखील त्याला विसर पडतो. असे होऊन श्रीगुरूंनी त्याला ओसंगी (मांडीवर) घेतले असता तो हंसू लागतो. ८८. याप्रमाणे हांसून व रडून तो भगवती श्रीगुरुजननीच्या मनाचे रंजन करतो. एरवी त्याला मागावयाचे काहीच नसते. ८९. या बाळाचे एवढे प्रबळ प्रेम असते की तो अशा रडण्या-हंसण्याने श्रीगुरुजननीस सुख देतोच, पण आपणही अत्यंत सुखी होतो; आणि तेव्हा बाळ माता आहे की माता बाळ आहे, हा भेद काहीच कळत नाही. व हा भेद उरतहि नाही. ९०.

**भेदाभासींहि कांहीं । कैवल्याची आशा नाहीं । आचार्य बोलिलेही । ऐसेंचि आथी ॥९१॥**

शंकराचार्यांचा श्लोक -

**''न मोक्षस्याकांक्षा भवविभववांछापि च न मे । न विज्ञानापेक्षा शशिमुखिसुखेच्छापि न पुनः ।**
**अतस्त्वां संयाचे जननि जननं यातु मम वै । मृडानी रुद्राणी शिव शिव भवानीति जपतः ॥''**

ओवी -

**मुक्त झालिया काय होणें । नसत्या भवा काय मागणें । अज्ञान गेलिया ज्ञान याचणें । कासयासाठीं ॥९२॥**
**'जननं यातु' या श्लोकपदेंकरून । जन्ममरण-खंती सोडोन ।**
**जननीत्यादि वचनेंकरून । प्रेमसंपन्न मतिबोधू ॥९३॥**
**एऱ्हवीं अर्थ स्पष्ट आहे । स्वारस्य बोलिलें पाहे । श्रीतुकारामोक्ति आहे । ऐसीचि कीरू ॥९४॥**
**'तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हासी'। याही वचनाची सरसी । वृत्ति करी ॥९५॥**

अर्थ :- असा हा भेदाचा भास झाला तरी कैवल्यादि कशाचीही आशा भक्ताला नसते. असे श्रीमत् शंकराचार्यांनीहि म्हटले आहे. (द्वैतातच मागणे संभवते. पण हे द्वैत, मागण्याकरता नसते). ९१. मला मोक्षप्राप्तीची इच्छा नाही तसेच संसारातल्या ऐश्वर्याचीही इच्छा नाही. फक्त मृडानी रुद्राणी शिव शिव भवानी' अशी नामे जपत असता माझे आयुष्य व्यतीत होवो; अशी, हे आई, मी तुझी प्रार्थना करतो. मुक्त झालो तरी विशेष प्राप्ती अशी काय आहे? अस्तित्वात नसलेल्या संसाराचे ऐश्वर्य काय मागायचे? अज्ञान नाहिसे झाल्यानंतर ब्रह्माज्ञानाची याचना कशाला पाहिजे? ९२. 'जननं यातु' (आयुष्य व्यतीत होवो) या पदावरून जन्ममरणाची खंती सोडून देऊन 'जननी' इत्यादि पदांवरून 'प्रेमाने संपन्न असा बोध' दाखविला आहे. ९३. एरवी श्लोकाचा अर्थ स्पष्ट आहे. त्यातील रहस्य होते तेवढे सांगितले. श्रीतुकाराम महाराजांचेहि असेच वचन आहे. ९४. 'आम्हाला सुखाने गर्भवासात घाल' या तुकाराम महाराजांच्या वचनाप्रमाणे अंतःकरणाची वृत्ति करावी. ९५.

**भेदाभासू जाय । अभेदचि होय । हें अखंड आश्चर्य । मायबाळांचें ॥९६॥**
**एवं अभेदमिठी । मज ज्ञानेश्वरपदांगुष्ठीं । पडो, सद्गुरु पाठींपोटी । भरोनियां ॥९७॥**
**अई ज्ञानेश्वरजननी । हृदयवैकुंठपीठवासिनी । चरणांगुष्ठस्तन मुखीं घालुनी । गंगापयःपानीं पाळि मातें ॥९८॥**
**॥ हरिः ॐतत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे प्रीतिनर्तने लालनाभिनये द्वितीयः पदन्यासः ॥ (य२उ१६२)**
**श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।**

अर्थ :- भेदाचा भास नाहिसा होतो आणि अभेद राहतो, असे या भक्तीत अखंड मायबाळांचे आश्चर्य असते. ९६. याप्रमाणे श्रीगुरु पाठीपोटी भरून श्रीगुरुंच्या चरणी ऐक्य मिठी पडो. ९७. हृदयरूप वैकुंठात वास करणाऱ्या आई ज्ञानेश्वरजननी मला चरणांगुष्ठरूपी स्तनपान करवून गंगारूपी दूध पाजून माझा सांभाळ कर. ९८.

हरिः ॐ तत्सत् श्रीसद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपाप्रसादाने ओवी-छंदातील प्रीतनर्तन ग्रंथाचा लालनाभिनयातील दुसरा पदन्यास समाप्त झाला.

# पदन्यास ३ रा

## ।। वात्सल्याभिनय ।।

**।। श्रीमद्सद्गुरुज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ।।**

**जयजय सद्गुरु पतितपावना । जयजय सद्गुरु विश्वजीवना । जयजय सद्गुरु करुणाघना । ज्ञानेश्वरा ।।१।।**
**जयजय सद्गुरु दीनउदारा । जयजय सद्गुरु मोहमुद्गरा ।**
**जयजय सद्गुरु सौख्यसुधाकरा । आळंदीश्वरा आचार्या ।।२।।**
**स्वामी आठवितां तव चरण । कालत्रयीं न सांपडे जनिमरण । जनन मरण संहरण । अवघें अज्ञान हारपे ।।३।।**
**म्हणोनी सांडोनि सर्व कांही । निवांत मस्तक तव पायीं । ठेविलें ज्ञानेश्वर आई । आतां व्यक्त होई ग्रंथरूपें ।।४।।**
**मागील करुणाबीजतरू । मातृपितृभक्ति फळभारू । प्रेमरसभरित अनिवारू । वाढला जो ।।५।।**
**तोचि असीम प्रेम मेळे । नानाभाव भांति[1] उगळे ।**
**क्रमावांचोनि येथिचे सोहळे । परी वाणी रूळे बोधार्थ क्रमी ।।६।।** (१.प्रकारेकरून)

अर्थ :- पतितांना पावन करणाऱ्या, इंद्रियांचा विषय होऊन जीवन धारण करणाऱ्या केवळ करुणेची मूर्ति अशा सद्गुरु श्रीज्ञानेश्वर महाराजा! आपला जयजयकार असो. १. दीन जनांविषयी कनवाळू असलेल्या, मोहरूपी अविद्येचा नाश करणाऱ्या, ब्रह्मानंदाचा वर्षाव करणाऱ्या चंद्रा, हे आळंदीचे स्वामी जगताचे गुरु अशा श्रीज्ञानेश्वर आचार्या ! आपला जययजयकार असो. २. हे महाराजा तुझे चरण आठविले असतां, तिन्ही काळी केव्हाच जनन मरण सापडत नाही. जन्म मरण व सर्व जगाचा नाश वगैरे हे सर्व अज्ञान नाहीसे होते. ३. म्हणून तुझ्या वाचून दुसरे सर्व काही सोडून देऊन निवांतणे एक तुझ्या चरणी मस्तक ठेविले आहे. आता हे ज्ञानेश्वर आई, तूंच ग्रंथरूपाने प्रकट हो. ४. मागील अध्यायात करुणारसाच्या बीजापासून झालेला व मातृपितृभक्तिरूपी फळांनी दाटलेला, असा अनिवार प्रेमाने जो वृक्ष वाढला, त्याचेच, निस्सीम प्रेमाच्या योगाने नानाप्रकारच्या प्रेमभावनांच्या द्वारा वर्णन केले आहे. आधी हे प्रेम व नंतर ते प्रेम असा निश्चित क्रम प्रेमात नसतो पण त्याचे वर्णन करताना मात्र दुसऱ्याला बोध होण्याकरता 'प्रेम कोणत्या क्रमाने निस्सीम होत जाते', हे सहजच वाणींतून प्रकट झाले आहे. ५-६.

**भगवंती पितृमातृभाव । तो ज्ञानानुमृदुभक्त्यनुभव । समाधीं व्युत्थानीं गुरुदेव । अंतर्बाह्य ।।७।।**
**'यस्य देवे परा भक्ति यथा देवे तथा गुराविति'। बुझावोनि जननी श्रुति । सत्पुत्रा बोधी ।।८।।**
**भक्तीनेंचि समाधि होत । ऐसें घेरण्डमुनी सांगत । जीवन्मुक्तिविवेकांत । विद्यारण्योक्त हेंचि कीं ।।९।।**
**यद्यपि चंद्रोदयादि पूर्ण । प्रारब्ध संपादी प्रयत्नावीण । आणि गृह क्षेत्रादि संपादन । यत्नेंकरून प्रारब्ध करी ।।१०।।**

अर्थ :- ज्ञानानंतर भगवंताचे ठिकाणी जो मातृपितृभाव ठेवला जातो तोच मृदू भक्तीचा अनुभव होय. येथे समाधिकाली व व्युत्थानकाली अन्तर्बाह्य गुरुदेवच असतात. ७. ''श्रीगुरुचे ठिकाणी व भगवंताचे ठिकाणी ज्यांची समान पराभक्ति आहे'' म्हणजे दोघांचेहि समान प्रेम करावे, असे श्रुतिमाता आपल्या सुपुत्रांना समजावून बोध करते. ८. भक्तीनेच समाधि सिद्ध होते, असे घेरण्डमुनींनी सांगितले असून जीवन्मुक्तिविवेक या ग्रंथात विद्यारण्यस्वामींनीहि तेच सांगितले आहे. ९. जरी चंद्रोदयादिकांच्या प्रकाशाचा लाभ मनुष्याला, त्याने 'प्रारब्धानुसार प्रयत्न केल्यावाचून' होतो. आणि घर-शेती इत्यादिकांचा लाभ मनुष्याने 'प्रारब्धानुसार प्रयत्न केल्याने' (नंतर) होतो. १०.

**आद्य प्रारब्धसंपाद्य निवृत्ति । न केलियाविणेंद्रियोपहति ।**
**आणि द्वितीय प्रारब्धसंपाद्य निवृत्ति । समाधीवीणही विरक्ति निश्चयें घडे ।।११।।**
**तथापि चंद्रोदयादि सकळ । ईश्वरनियतिप्रधान प्रारब्धफळ ।**

ओवी -

**'समाधिव्युत्थानीं हरि विलसे' । आणि 'मुरलीनादें' ऐसें ।**
**पदांत जें वचनद्वय असें । तें बोधी व्युत्थानेऽपि भक्तौ ब्रह्मसुख ॥१९॥**
**यालागीं समाधीं अथवा व्युत्थानीं । वृत्ति जडतां नारायणीं ।**
**ज्ञानें मिथ्याभवनिराकरणीं । बंध निर्वाणी नसे कीं ॥२०॥**

अर्थ :- एखादे वेळेस जर श्रीगुरूंच्या उच्छिष्ट प्रसादाचा लाभ झाला तर त्या लाभापुढे गुरुभक्ताला समाधिसुख देखील नकोसे होते. १६. 'श्रीगुरुसेवेचा प्रत्यक्ष दिसणारा सोहळा सोडून डोळे बंद करून समाधीत कोण बसणार आहे? हे श्रीतुकाराम महाराजांचे वचनहि तेंच सांगते. १७. आणि श्रीदेवनाथ महाराजांनीहि याच अर्थाची, पदाच्या पद्धतीला धरून पूर्ण असलेली, वाक्ये गोपिकांच्या तोंडी घातलेली आहेत. १८. 'समाधि व व्युत्थान या दोन्ही दशेमध्ये श्रीहरीचा आणि त्याच्या मुरलीनादाचा अनुभव येतो' 'समाधिव्युत्थानी हरि विलसे' व 'मुरलीनादे' या पदातील दोन्ही वचनात 'भक्तिमध्ये समाधीत व व्युत्थानात, दोन्ही ठिकाणी ब्रह्मसुखच असते', असे सुचविले आहे. १९. म्हणून समाधीत किंवा व्युत्थानात भगवंताचे ठिकाणी मन जडले असता ज्ञानाने खोटा भवबंध नाहीसा करण्याकरता तो शिल्लक उरतच नाही. २०.

**नातरी टिवटिवी फिरे आकाशी । परी चित्त पिलियापाशीं ।**
**तैसें हृदयीं आठविता हृषीकेशी । तरी बंधन मग कैचें ॥२१॥**
**कीं दुग्धासाठीं मार्जार हिंडे । आणि विषयासाठीं इंद्रियगण तंडे ।**
**तैसें हृदयीं हरिप्रेम जोडे । तरी बंधन मग कैचें ॥२२॥**
**यास्तव अर्धघडी रिकामा । न राहोनि श्यामा मन विश्रामा ।**
**आठवितां निजसुखधामा । तरी बंधन मग कैचें ॥२३॥**
**कीं वयाअंतीं एकलें प्रसवे वांझोटी । मग जीव तळमळे होतां बाळतुटी ।**
**तैसे हरिप्रेम व्यापितां पोटीं । तरी बंधन मग कैचें ॥२४॥**

अर्थ :- किंवा टिटवी पक्षीण आकाशात फिरते पण तिचे लक्ष पिल्यापाशी असते त्याप्रमाणे मनुष्याचे मनात अखंड भगवच्चिंतन राहील तर मग त्याला संसारबंधन कोठून भासणार? २१. किंवा दुधासाठी मांजर ज्याप्रमाणे सारखी घरात फिरते आणि विषयसुख भोगण्याकरता इंद्रियगण जसा तळमळतो, तसे हृदयात श्रीहरीचे सारखे प्रेम राहीले तर संसारबंधन कोठून भासणार! २२. म्हणून अर्धघडी देखील रिकामा न राहता, मनाचे विश्रांतिस्थान असलेल्या ब्रह्मसुखाचे आगर असलेल्या अशा मेघश्यामाचे ठिकाणी मन जडले असता संसारबंधन कोठून भासणार? २३. वांझ असलेल्या स्त्रीला शेवटी शेवटी एकुलता एक मुलगा झाला. त्या बाळाची तुटी (वियोग) झाली असता ती जशी तळमळते, तसे श्रीहरीचे प्रेम पोटात मावेनासे झाले असता संसारबंधन कोठून भासणार? २४.

(श्रीबाबाजीमहराज पंडित यांनी केलेला अनुवाद समाप्त)

-----

**तेचि प्रेमाची नवाई । वात्सल्यसुखाचिया ठायीं । पूर्वील भक्ति लवलाहीं । आली होय ॥२५॥**
**मनीं ऐसें वाढे दृढ । रडोनि कष्टविला हरि उघड । परी सेवा न घडली सुगड । मम करौनि ॥२६॥**
**हेंचि एक चित्तीं उठे । मग वृत्तीसी समाधान गोमटे । वात्सल्यस्नेहें प्रगटें । अगाध तें ॥२७॥**
**अत्यंत स्नेहाळ माय असतां । (य२उ.१६५) बाळातें क्षुधाही नसतां ।**
**परी स्तन ओठीं लावितां । प्रेमपान्हा उमटे ॥२८॥**
**तेवीं आत्मपरमात्मया भेद नाही । परी प्रेमाची नवल नवाई । कोमल चित्ते शेषशायी । सुखी राहो हे वाटे ॥२९॥**
**तया नित्यनिर्मळा स्नान । तया नित्यतृप्ता भोजन ।**
**तया सर्वव्यापका कडिये ग्रहण । नवल विंदान भक्तीचें ॥३०॥**
**तया असीमासी सीमा । तया अनामा ठेवूनि नामा ।**

